१०४ शतकोत्तर वाटचाल

एकमेव स्वतंत्र दैनिक

# नवाकाळ

NAVAKAL

• पुणे, गुरुवार २८ मे, २०२६ • वर्ष-५, अंक-२४८, पाने-८, किंमत: ₹ ७

• R.N.I.No-MAHMAR/2021/81075 • Vol.- 5, Issue - 248 Marathi - Daily - Pune, 28 May, 2026 Page - 8 Price- Rs. 7/-

• संपादक- रोहित रमाकांत पांडे 24x7 : www.navakal.in Email- contact@navakal.in

नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!

'गोकुळ'च्या शुद्ध शाकाहारी तूप-लोण्याला हलाल सर्टिफिकेटची काय गरज?

navakal.in

@navakal.news Navakal Digital Network @_NDN_Offical @NavakalNews

# मुंबईच्या सोसायट्यांमध्ये ईदच्या कुर्बानीवरून वाद

## सोमय्यांनी वातावरण तापवले! पालिकेकडून दबावात परवानगी रद्द

**बकरा कुर्बानीवरून मीरा रोड येथे वाद झाल्यानंतर आज मुंबईतील घाटकोपर, गोरेगाव, मीरा-भाईंदर येथेही वातावरण तापले. रहिवासी सोसायट्यांच्या परिसरात उघड्यावर बकरा कुर्बानीला कडाडून विरोध करण्यात आल्यानंतर पालिकेने दबावाखाली माघार घेत परवानगी रद्द केली. त्यामुळे मुस्लीम बांधव नाराज झाले. त्यातच भाजपा नेते किरीट सोमय्या यांनी घाटकोपर येथे जाऊन इथे कुर्बानी होऊ देणार नाही, अशी भूमिका घेतल्याने वातावरण तापले. त्यानंतर महापालिकेने कुर्बानीचे सर्व बकरे ताब्यात घेतल्याने ईदच्या सणावेळी तणाव निर्माण झाला आहे.**



■ मुंबई

**घाटकोपरमधील** सागर पार्क सोसायटीमध्ये गेल्या सुमारे ३० वर्षांपासून बकरा कुर्बानीची परंपरा सुरू असल्याचे मुस्लीम नागरिकांनी सांगितले. मात्र यावर्षी मध्यरात्री मुंबई महानगरपालिकेकडून कुर्बानीची परवानगी रद्द करण्यात आल्याने वादाला सुरुवात झाली. या निर्णयानंतर परिसरात मोठ्या प्रमाणावर पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला. राज्य राखीव पोलीस दलाची तुकडीही घटनास्थळी दाखल झाली. या निर्णयामुळे सोसायटीतील मुस्लीम बांधवांनी नाराजी व्यक्त करत आम्ही सोसायटीच्या आवारात कुर्बानी करणार नाही. महापालिकेने पर्यायी जागा उपलब्ध करून द्यावी. आम्हाला सोसायटीचे नाव खराब करायचे नाही, अशी भूमिका मांडली. याचवेळी भाजपा नेते किरीट सोमय्या सोसायटी परिसरात पोहोचले. त्यांनी इथे कत्तल होऊ देणार नाही, कुर्बानी देण्यासाठी पालिकेने वेगळी व्यवस्था करावी, तिथे जाऊन तुमचे धार्मिक विधी करा, त्याला आमचा विरोध नाही, अशी मागणी केली. याचदरम्यान, काही जण बकरे घेऊन सोसायटीमध्ये आल्याने पुन्हा वाद झाला. त्यानंतर महापालिका कर्मचाऱ्यांनी येथील सर्व बकरे ताब्यात घेतले.

यावेळी किरीट सोमय्या म्हणाले की, कुर्बानीसाठी आणलेल्या ३१ बोकडांपैकी २३ बोकड महापालिकेने ताब्यात घेतले आहेत. महापालिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी कबूल केले आहे की, अपूर्ण माहिती दिल्याने परवानगी दिली होती, पण इथे बकरीची कत्तल होऊ शकत नाही. मला सोसायटीचा एक पदाधिकारी स्वतः भेटला आणि त्यांनी सांगितले की, त्यांच्या पदाधिकाऱ्यांनी चुकीची कागदपत्रे दिली होती. मात्र, या सोसायटीत कुर्बानीला परवानगी नाही. उद्याही इथे कुर्बानी होऊ देणार नाही. पण पालिकेनेही जबाबदारीने काम केले पाहिजे. सुरक्षा राखणे हे पोलिसांचे काम आहे. प्रत्येक जागेवर सोमय्या जाणार का? दोन दिवसांपूर्वी हिंदू रस्त्यावर उतरले म्हणून हे घाबरले आहेत.

गोरेगाव पूर्व येथील गोकुळधाम परिसरातही बकऱ्याच्या कुर्बानीवरून वाद झाला. सॅटेलाईट गार्डन फेज-२ मधील आझाद नगर डी-३ इमारतीच्या आवारात उघड्यावर कुर्बानीला स्थानिकांनी विरोध केला. याबाबत भाजपाच्या स्थानिक नगरसेविका प्रिती सातम यांनी पालिकेचे सहाय्यक आयुक्त, पी (दक्षिण) विभाग यांच्याकडे लेखी निवेदन देऊन, मागील वर्षीही नागरिकांच्या तक्रारीनंतर प्रशासनाने या ठिकाणची परवानगी रद्द केली होती. यंदा कोणत्याही परिस्थितीत उघड्यावर कुर्बानीस परवानगी देऊ नये, अशी मागणी केली. पान ७ वर

# गोकुळच्या उत्पादनाला हलाल प्रमाणपत्र! निवडणुकीचा खेळ



**कोल्हापूरच्या गोकुळ दूध संघाच्या दूध, तूप, लोणी या उत्पादनांसाठी हलाल सर्टिफिकेट घेण्यात आले असे उघड झाले आणि नव्या वादाला तोंड फुटले आहे. कोल्हापूरचे महत्त्वाचे नेते हसन मुश्रीफ यांचा पुत्र अध्यक्ष असताना हे सर्टिफिकेट घेण्यात आले आहे. गोकुळ दूध संघाच्या निवडणुकीचे पडघम वाजताच हा शोध जाहीर करून मुश्रीफ यांच्या बदनामीचे निवडणुकीचे राजकारण सुरू झाले आहे.**

■ कोल्हापूर

**या** हलाल प्रमाणपत्राशिवाय आखाती देशात आणि परदेशातील इतर काही देशांत उत्पादने निर्यात करता येत नाहीत. त्यामुळे व्यावहारिक कारणांसाठी हे प्रमाणपत्र घेतले हे स्पष्ट असताना हा मुद्दा उचलून राजकारण केले जात आहे, असे जाणकार सांगतात. पान ७ वर

# 'एसआयआर' घटनात्मकदृष्ट्या वैध सर्वोच्च न्यायालयाचे शिक्कामोर्तब



■ नवी दिल्ली

**मतदार** याद्यांच्या विशेष सखोल फेरतपासणीवर (एसआयआर) आक्षेप घेत निवडणूक आयोग आणि केंद्र सरकारवर सातत्याने टीकेची झोड उठवणाऱ्या विरोधी पक्षांना सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयामुळे आज जबरदस्त झटका बसला आहे. एसआयआर हा निवडणूक आयोगाचा घटनात्मक अधिकार आहे, असा स्पष्ट निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाने आज दिला. त्याचवेळी न्यायालयाने हेदेखील स्पष्ट केले की, मतदारांच्या नागरिकत्वाचा तपास करण्याचा अधिकार निवडणूक आयोगाला आहे. मात्र हा अधिकार केवळ मतदार याद्यांपुरता मर्यादित आहे. मतदार यादीतून एखाद्याचे नाव आयोगाने कमी केले. याचा अर्थ ती व्यक्ती भारतीय पान ७ वर

# पोर्श अपघातातील अग्रवाल कुटुंबाचा जल्लोष

■ पुणे

**पुण्यातील** कल्याणीनगर येथील बहुचर्चित पोर्श कार अपघात प्रकरणाने राज्यभर मोठी खळबळ उडाली होती. या प्रकरणातील अल्पवयीन आरोपीचे वडील आणि बांधकाम व्यावसायिक विशाल अग्रवाल तसेच त्यांच्या पत्नीला पोलिसांनी अटक केली होती. काही दिवसांपूर्वीच न्यायालयाने त्यांना अटी व शर्तीसह जामीन मंजूर केला. तुरुंगातून बाहेर आल्यानंतर अग्रवाल कुटुंबाने जंगी पार्टी करत आनंदोत्सव साजरा केल्याचा व्हिडिओ आता व्हायरल झाला आहे.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

# नीट पेपरफुटीचा 'गॉड' तेजस शहा लातूरचा डॉक्टर शिरुरेलाही अटक



■ पुणे

**नीट** पेपरफुटी प्रकरणात अटक आरोपी मनीषा हवालदारच्या नवऱ्याच्या मोबाईल फोनमधील 'गॉड' नावाने सेव्ह असणारा नंबर येथील डॉ. अभंग प्रभू मेडिकल अकादमी या कोचिंग सेंटरमध्ये फिजिक्सचा प्राध्यापक तेजस शहा याचा असल्याचे उघड झाले असून, त्याला सीबीआयने आज अटक केली आहे. तसेच लातूरहून डॉक्टर मनोज शिरुरे यालाही अटक करण्यात आली आहे. नीट-युजी पेपरफुटी प्रकरणात अटक केलेल्या आरोपींची संख्या आता १३ झाली आहे.

सीबीआयच्या प्राथमिक तपासानुसार तेजस शहा याने चौकशीदरम्यान संबंधित कागदपत्रे आणि डिजिटल पुरावे नष्ट केल्याचा संशय आहे. शहाने या प्रकरणातील आधीच अटक झालेली आरोपी मनीषा हवालदार हिच्याकडून नीट परीक्षेचे भौतिकशास्त्राचे फुटलेले प्रश्न मिळवल्याचा पान ७ वर






नवाकाळ
Email- contact@navakal.in www.navakal.in /navakalofficial

# छोट्या जाहिराती

संपर्क करा
८४२२८१७४४५/८१०८११६४२३

## पाहिजेत

मालाड वेस्ट येथे इमिटेशन ज्वेलरी कामासाठी मुली/ महिला पाहिजेत. **9987577655** {NC260667}

स्त्री पुरुष केअर टेकर पाहिजेत घरकुल केअर सेंटर :**9819426634/ 9969529162** {NC260638}

ऑफीस बाहेर कामासाठी मुले पाहिजे. पगार 12000/- + प्रवास भत्ता. प्रत्यक्ष भेटा.. ग्लोबल सोल्युशन, ४०२ साई आर्केड, नेताजी सुभाषचंद्र रोड, मुलुंड वेस्ट, मुंबई- 400080 {NC260674}

CCTV आणि SOLAR इंस्टॉलर पाहिजे. पगार २५०००/- पासून + प्रवास भत्ता. प्रत्यक्ष भेटा. ग्लोबल सोल्यूशन, ४०२ साई आर्केड, नेताजी सुभाषचंद्र रोड, मुलुंड वेस्ट, मुंबई- 400080 {NC260675}

इंटरनॅशनल शाळेमध्ये मीरारोडयेथे सफाई कर्मचारी बाई/ पुरुष पाहिजेत. **8169862708/ 9004949778** {NC260683}

माटुंगा- टेलिकॉलिंगसाठी (मुलगी) पाहिजे. १२वी पास. उमेश केमिकल्स. **9324236570** {NC260717}

पाण्याची टाकी (मेकॅनिकल) किलिनिंगसाठी पुरुष लेबर पाहिजेत. संपर्क : **9321319809 / 9819543826** {NC260703}

लेथ मशीन टर्नर, ड्रिलिंग टॅपिंग व हँडप्रेस पॉवरप्रेस मेटलशीट व मेटल बफिंग, बेंडिंग व प्लास्टिक इंजेक्शन मोल्डिंग मशीनचे हुशार कारागीर, हेल्पर मुले/मुली व एम्ब्रोडरी मशीन ऑपरेटर पाहिजेत. २४० शांती इंडस्ट्रियल इस्टेटजवळ, तांबे नगर, एसएन रोड, मुलुंड वेस्ट, मुंबई - 400080. दिलीप पांचाळ **9221232176** {NC260684}

## पाहिजेत

घरकामासाठी (10/12/24 तास) बेबीकेअर / जापाबाई आणि कुकींगसाठी अनुभवी ''बायका/ मुली'' पाहिजेत पगार- 20,000/- ते 40,000/- रंजीतसर **9321417007 / 9892575886** दादर वेस्ट {NC260403}

कंपनीमध्ये भरती कोकम आमरस पॅकिंगसाठी मुली पाहिजे 19720/- - 24840/- : **9137713434** {NC260713}

दादर (सिद्धिविनायक) येथे 20 वर्षाचा अनुभवी, संपूर्ण निर्व्यसनी, 45 वर्षांच्या आतीलच. जवळपास राहणारेच ड्रायव्हर पाहिजेत. पगार - 25000+ 2000/- संपर्क - **9867220029 /808089885** {NC260714}

इमिटेशन ज्वेलरीसाठी त्वरित अनुभवी मुली पाहिजेत. दहिसर ईस्ट, संपर्क **7021374861** {NC260715}

## पाहिजेत

अंधेरी ईस्टमध्ये कुरीयर कंपनीसाठी पिकअप बॉय पाहिजेत. ॲशियानेट लॉजिस्टिक- **8097449888** {NC260718}

## Situation Vacant

Wanted courier boys for international Couriers at Khar. call **9930011100** {NC260686}

## शैक्षणिक

हमखास पासाची गॅरंटी खर्डीकर क्लासेस. ७वी नापास? डायरेक्ट १०वी. ११वी नापास? डायरेक्ट १२वी. डोंबिवली: **9820627580 / 9820904646** {NC260552}

## व्यवसायविषयक

स्वतःचा लघुउद्योग सुरू करून दिवसा 3000/- कमवा अनिरुद्धा दादर- **9076403434/ 8652643434** {NC260680}

## व्यसन मुक्ती

दारू सोडवा : दारू, तंबाखू, गुटखा, सिगारेट, औषधे उपलब्ध. डॉ. नागरगोजे- **9765609769** {NC260716}

### वाचकांना सूचना

दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वतःच्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी.

**- मॅनेजर, 'नवाकाळ'**

BMS Online वर सुरू • फोन : ९१६७२७५५३०
वाशीची ति. वि. थिएटरवर सुरू
३१ मे २ प्रयोग पुणे
आज (HOLIDAY) दु.४ विष्णुदास भावे, वाशी
जून ५ दुपार ठाकरे, ६ दुपार शिवाजी, ७ दुपार कल्याण
प्रसाद खांडेकर, भाग्यश्री मिलिंद, ओंकार राऊत, भक्ती देसाई, प्रथमेश शिवलकर, नम्रता संभेराव
प्रसाद खांडेकर सादर करीत आहे
व्ही आर प्रॉडक्शन प्रकाशित
लेखक, दिग्दर्शक प्रसाद महादेव खांडेकर


प्रयोगासाठी संपर्क
9867877651, 9869438887

# पुढील ११ दिवसांत शेतीकामे पूर्ण करा

■ अहिल्यानगर

**राज्यात** येत्या काही दिवसांत हवामानात बदल होणार असून शेतकऱ्यांनी तातडीने शेतीची कामे पूर्ण करून घ्यावीत, असे आवाहन हवामान अभ्यासक पंजाबराव डख यांनी केले आहे. आजपासून पुढील सुमारे ११ दिवस राज्यात मौसमी पाऊस सक्रिय राहणार असल्याचा अंदाज त्यांनी व्यक्त केला आहे.

डख म्हणाले की, २७ ते ३० मे दरम्यान राज्यात विखुरलेल्या स्वरूपात अवकाळी पावसाच्या सरी पडतील. हा पाऊस सर्वत्र न पडता काही भागांपुरता मर्यादित राहील. मात्र ३१ मेपासून पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. ५ ते ७ जूनदरम्यान राज्यातील विविध भागांत चांगला पूर्व-मोसमी पाऊस होईल. पूर्व विदर्भ, पश्चिम

## डख यांचे आवाहन

विदर्भ, मराठवाडा, खानदेश, उत्तर महाराष्ट्र, दक्षिण महाराष्ट्र आणि कोकण पट्ट्यात या कालावधीत दररोज वेगवेगळ्या ठिकाणी पावसाची हजेरी लागेल.

काही भागांत मुसळधार पाऊस पडून नाले वाहण्याची शक्यता आहे, तर काही ठिकाणी रिमझिम सरी आणि विजांच्या कडकडाटासह पाऊस होऊ शकतो. ७ ते ८ जूननंतर राज्यात मान्सूनच्या पावसाची अधिकृत सुरुवात होण्याची चिन्हे आहेत. यंदा मान्सूनसाठी वातावरण अत्यंत पोषक आहे. त्यामुळे जूनच्या पहिल्या व दुसऱ्या आठवड्यातच अनेक भागांत पेरण्या सुरू होण्याची शक्यता आहे. शेतकऱ्यांना सल्ला देताना त्यांनी सांगितले की, ३१ मेपूर्वीचा पाऊस अवकाळी समजावा, तर १ जूननंतर पडणारा पाऊस मान्सूनचा म्हणून गृहीत धरावा. मात्र पेरणीचा निर्णय घेताना जमिनीत पुरेशी ओल निर्माण झालेली आहे का, याची खात्री करूनच पुढील पाऊल उचलावे.

# दादर टिळक भवनसमोर काँग्रेस पक्षाचे आंदोलन

■ मुंबई

**काँग्रेस** प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या नेतृत्वाखाली दादर येथील टिळक भवनबाहेर शेतकरी आणि सर्वसामान्यांना भेडसावणाऱ्या विविध प्रश्नांवर आंदोलन करण्यात आले. कांद्याचे पडलेले भाव, इंधन टंचाई, इंधन दरवाढीवरून राज्यभरात वाढत्या असंतोषाच्या पार्श्वभूमीवर हे निदर्शने करण्यात आली. या आंदोलनादरम्यान हर्षवर्धन सपकाळ यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर अत्यंत आक्रमक शब्दांत टीका केली.

हर्षवर्धन सपकाळ आंदोलनादरम्यान पत्रकारांशी बोलताना म्हणाले की, देशातील इंधनाचा तुटवडा असून तो प्रश्न सरकारला सोडवत आला नाही. मुख्यमंत्री सांगतात की, डीझेल, पेट्रोल आहे. तर दुसरीकडे पंपांवर लांबच रांगा दिसत आहेत. मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिल्लीहून भक्कम असे पॅकेज आणावे. नाहीतर आम्ही त्यांना रस्त्यावर फिरू देणार नाही असा इशारा सपकाळ यांनी दिला. मेलोडी चॉकलेट वाटणे बंद करावे आणि काम करावे असा टोला पंतप्रधान मोदी यांना लगावला. तत्पूर्वी , आज मविआची टिळक भवनमध्ये बैठक पार पडली. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमधून विधान परिषदेवर निवडून द्यायच्या १६ जागा व नागपूरच्या एका जागेवरील पोटनिवडणूक अशा सर्व १७ जागा महाविकास आघाडी लढवणार आहे. यासाठी जागावाटपाची प्राथमिक चर्चा आज दोन दिवसात पुन्हा एक बैठक घेऊ आणि सर्वसंमतीने जागा वाटपाचा निर्णय जाहीर करु.

# प्रलंबित मागण्यांसाठी एसटी कर्मचाऱ्यांचे २९ जूनपासून बेमुदत धरणे आंदोलन

■ मुंबई

**प्रलंबित** आर्थिक मागण्यांवर अद्याप निर्णय न झाल्याने महाराष्ट्र एस.टी. कामगार संयुक्त कृती समितीने राज्य सरकार आणि एसटी महामंडळ प्रशासनाविरोधात आंदोलनाची हाक दिली आहे. १४ जूनपर्यंत मागण्या मान्य न झाल्यास २९ जूनपासून राज्यभर बेमुदत धरणे केले जाणार आहे.

कृती समितीने म्हटले आहे की, ऑक्टोबर २०२५ मध्ये उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत अनेक आर्थिक मागण्यांवर निर्णय घेण्याचे मान्य झाले होते. कर्मचाऱ्यांच्या थकीत वेतनवाढीचे हप्ते सुरू झाले असले तरी इतर महत्त्वाच्या मागण्यांवर अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. कर्मचाऱ्यांना राज्य सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतन लागू करावे, महागाई भत्ता आणि घरभाडे भत्त्याची थकबाकी द्यावी, कॅशलेस मेडिक्लेम सुविधा लागू करावी, तसेच एस.टी.मध्ये कंत्राटी भरती थांबवावी, अशा प्रमुख मागण्या आहेत. याशिवाय स्वमालकीच्या ई-बसेस खरेदी कराव्यात, एस.टी.च्या जागा खासगी भाडे तत्वावर न देता महामंडळाने स्वतः विकसित करावी, अशीही मागणी आहे. यासाठी १५ जून रोजी राज्यभर घंटानाद आणि महाआरती आंदोलन करण्यात येणार असून जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले जाईल.

# जपानचा भारताला दणका आंब्यांच्या आयातीवर बंदी

■ नवी दिल्ली

**जपानने** भारतातून निर्यात केल्या जाणाऱ्या आंब्यावर बंदी घातली आहे.भारतीय आंब्यांचा दर्जा जपानच्या गुणवत्ता मानकांची पूर्तता करत नाही,असे जपानचे म्हणणे आहे.

गेल्या मार्च महिन्यात जपानच्या प्लांट क्वारंटाईन विभागाचे अधिकारी भारतात पाहणी करण्यासाठी आले होते. त्यांनी भारतातील फळ प्रक्रिया केंद्रांची पाहणी केली होती. त्यावेळी जपानी अधिकाऱ्यांनी काही त्रुटी दाखवून दिल्या होत्या. त्या दूर केल्यानंतरच आंब्यांची निर्यात करण्यात आली होती. मात्र योकोहामा प्लांट प्रोटेक्शन असोसिएशनने ३१ मार्च रोजी जारी केलेल्या निवेदनात जपानच्या सरकारी प्लांट प्रोटेक्शन स्टेशनच्या एका अधिसूचनेच्या हवाल्याने असे नमूद केले की २५ मार्च किंवा त्यानंतर भारताकडून जारी करण्यात आलेली तपासणी प्रमाणपत्र असलेल्या आंब्यांना जपानमध्ये प्रवेश दिला जाणार नाही. भारताने आंब्याच्या सुरक्षा मानकांमध्ये सुधारणा केली आहे याची खात्री जपानच्या अधिकाऱ्यांना जोपर्यंत पटत नाही तोपर्यंत आंबा आयात बंदी लागू राहील.

# केरळचे माजी मुख्यमंत्री विजयन यांच्यावर ईडी कारवाई! समर्थकांकडून दगडफेक

■ तिरुवनंतपुरम

केरळचे माजी मुख्यमंत्री पी. विजयन यांच्या घरावर आज ईडीने छापा टाकला. यावेळी छापेमारी करायला गेलेल्या ईडी पथकावर विजयन यांच्या समर्थकांनी जोरदार हल्ला केला. त्यांनी ईडी अधिकाऱ्यांची गाडी अडवून तिच्या काचा फोडल्या. यामुळे परिस्थिती काही काळ तणावपूर्ण झाली होती. पोलिसांनी हस्तक्षेप करून परिस्थिती नियंत्रणात आणली. या प्रकरणी माकपने राजकीय सूडबुद्धीचा आरोप केला आहे.

ईडीच्या १२ सदस्यीय पथकाने आज तिरुवनंतपुरममधील बेकरी जंक्शन परिसरातील विजयन यांच्या घरासह इतर ठिकाणांवर छापेमारी केली. ही कारवाई त्यांच्या मुलीच्या आयटी कंपनी एक्सालॉजिक सोल्यूशन्सशी संबंधित मनी लॉन्ड्रिंग प्रकरणात करण्यात आली. हे प्रकरण कोचीन मिनरल्स अँड रुटाइल लिमिटेड मनी लॉन्ड्रिंग प्रकरणाशी संबंधित आहे. यापूर्वी केरळ हायकोर्टाने कोचीन मिनरल्स अँड रुटाइल लिमिटेडची याचिका



फेटाळली होती. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी ही कारवाई करण्यात आली.

२०१८-१९ दरम्यान कोचीन मिनरल्स अँड रुटाइल लिमिटेड कंपनीने विजयन यांच्या मुलीच्या आयटी कंपनीला १.७२ कोटी रुपये दिले होते. कोणतीही सॉफ्टवेअर किंवा आयटी सेवा न देता हे पैसे देण्यात आले, असा आरोप आहे. या प्रकरणात ईडीने २०२४ मध्ये पीएमएलए अंतर्गत गुन्हा दाखल करून तपास सुरू

# सिंधुदुर्गात ३० मे रोजी राज्यस्तरीय सैनिक मेळावा

■ सिंधुदुर्ग

**सैनिक** फेडरेशनच्या वतीने ओरोस बुद्रुक येथे ३० मे रोजी राज्यस्तरीय सैनिक मेळावा आणि स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. राजमाता जिजाऊ सभागृह, जिजामाता चौक येथे सकाळी १० वाजता हा मेळावा पार पडणार आहे. या कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने होणार असून त्यानंतर मान्यवरांचे स्वागत आणि शहीद सैनिकांना श्रद्धांजली अर्पण करण्यात येईल.मेळाव्यात सैनिक आणि माजी सैनिकांच्या हितासंदर्भातील विविध प्रश्नांवर चर्चा होणार आहे. ब्रिगेडियर सुधीर सावंत यांचे अध्यक्षीय भाषण होईल. यानंतर दुपारी १.३० वाजता उपस्थितांसाठी स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले आहे. सैनिक, माजी सैनिक आणि त्यांच्या कुटुंबीयांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# आजचे राशी भविष्य

गुरुवार ता. २८ मे २०२६
ज्योतिष पंडीत शिरीष प्रभू

| | |
|---|---|
| मेष | प्रगतीकारक दिवस. तुमच्या बोलण्याचा इतरांवर प्रभाव राहील. नोकरीत पत वाढेल. |
| वृषभ | अनपेक्षित घटनेची शक्यता. महत्त्वाचे निर्णय काळजीपूर्वक घ्या. तणाव न घेता कामे करा. |
| मिथुन | शांतचित्ताने व संयमाने दिवस व्यतीत करा. खिलाडू वृत्ती ठेवणे हिताचे ठरेल. खंबीर राहा. |
| कर्क | बोलण्यातून गैरसमज होणार नाही याची काळजी घ्या. कामात दिरंगाई होईल. संयम बाळगा. |
| सिंह | अतिशय फलदायक दिवस. हाती घेतलेल्या सर्व कामात आगेकूच होईल. मेहनतीची दखल घेतली जाईल. |
| कन्या | महत्त्वाचे निर्णय घेण्यास दिवस अनुकूल नाही. इच्छापूर्तीसाठी प्रतीक्षा करणे उचित राहील. खर्चाला कात्री लावा. |
| तूळ | महत्त्वाचे निर्णय लांबणीवर टाकणे हिताचे राहील. पैशाच्या बाबतीत सावध राहा. संवादकौशल्यात सुधारणा करा. |
| वृश्चिक | महत्त्वाचे निर्णय घेण्यास अनुकूलता नाही. खर्चावर ताबा ठेवा. कामात चुका होण्याची शक्यता. चमचमीत खाणे टाळा. |
| धनु | दिवस अनुकूल राहील. महत्त्वाचे निर्णय घेता येतील. सगळ्या गोष्टी मनाजोगत्या घडतील. |
| मकर | अंगभूत कौशल्याला वाव मिळेल. वरिष्ठांची प्रशंसा लाभेल. दिवस प्रगतीकारक राहील. |
| कुंभ | दानधर्म तुमच्यासह प्रियजनांसाठी फलदायक ठरेल. पितरांचे आशीर्वाद प्राप्त करण्यासाठी काही विधी अवश्य करा. तब्येतीची हेळसांड टाळा. |
| मीन | वैयक्तिक आयुष्यात जबाबदाऱ्या वाढतील, त्याचा काहीसा ताण येईल. उद्दिष्ट स्पष्ट ठेवा. |

## निकाल — गणेशलक्ष्मी विजयी विकली लॉटरी

महाराष्ट्र राज्य लॉटरी • सोडत सायं. 5:00 वाजता
सोडत दर बुधवार • सोडत क्रमांक 21 • तिकीट किं. रु. 10/- • सोडत दिनांक 27/05/2026

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- : **MG-07 : 5984**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 6166 | | | | | | | | | |
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 6735 | | | | | | | | | |
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 2353 | 3186 | 3977 | 4062 | 6698 | 7685 | 7867 | 8924 | 8944 | 8972 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 0461 | 1125 | 2547 | 3450 | 5403 | 5525 | 5940 | 8940 | 9650 | 9955 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 0567 | 0735 | 1498 | 2376 | 4397 | 5404 | 7437 | 8147 | 8173 | 9161 |

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1214 | 2322 | 3168 | 4246 | 5555 | 6796 | 7667 | 8358 | 9119 |
| | | 1224 | 2361 | 3172 | 4401 | 5562 | 6816 | 7707 | 8438 | 9140 |
| | | 1239 | 2441 | 3234 | 4430 | 5654 | 6826 | 7712 | 8518 | 9215 |
| 0002 | 0613 | 1315 | 2455 | 3240 | 4466 | 5672 | 6967 | 7744 | 8579 | 9239 |
| 0041 | 0624 | 1330 | 2522 | 3287 | 4474 | 5785 | 6969 | 7758 | 8582 | 9244 |
| 0051 | 0682 | 1555 | 2524 | 3333 | 4556 | 5860 | 7087 | 7778 | 8586 | 9262 |
| 0093 | 0737 | 1628 | 2543 | 3347 | 4640 | 5983 | 7124 | 7781 | 8612 | 9282 |
| 0103 | 0783 | 1651 | 2549 | 3374 | 4855 | 6022 | 7147 | 7877 | 8629 | 9322 |
| 0120 | 0895 | 1665 | 2572 | 3396 | 4980 | 6168 | 7159 | 7907 | 8689 | 9430 |
| 0162 | 0898 | 1678 | 2590 | 3399 | 5054 | 6265 | 7208 | 7973 | 8841 | 9435 |
| 0204 | 0910 | 1692 | 2654 | 3431 | 5125 | 6296 | 7277 | 8028 | 8852 | 9489 |
| 0260 | 0994 | 1741 | 2681 | 3439 | 5165 | 6432 | 7282 | 8048 | 8854 | 9495 |
| 0307 | 1016 | 1782 | 2742 | 3487 | 5167 | 6462 | 7363 | 8058 | 8865 | 9497 |
| 0318 | 1085 | 1788 | 2851 | 3628 | 5170 | 6464 | 7372 | 8077 | 8886 | 9541 |
| 0360 | 1101 | 1837 | 2920 | 3629 | 5253 | 6611 | 7376 | 8082 | 8889 | 9669 |
| 0448 | 1116 | 1869 | 2939 | 3648 | 5355 | 6616 | 7441 | 8088 | 8978 | 9679 |
| 0467 | 1137 | 2026 | 2981 | 3834 | 5393 | 6653 | 7471 | 8189 | 9064 | 9732 |
| 0589 | 1141 | 2046 | 3002 | 3874 | 5421 | 6658 | 7472 | 8193 | 9091 | 9854 |
| 0590 | 1142 | 2090 | 3068 | 3909 | 5502 | 6690 | 7567 | 8237 | 9092 | 9949 |
| 0604 | 1183 | 2225 | 3143 | 3936 | 5521 | 6693 | 7575 | 8289 | 9098 | 9969 |
| 0609 | 1199 | 2285 | 3148 | 4139 | 5553 | 6766 | 7648 | 8296 | 9099 | 9998 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी महाराष्ट्र गजलक्ष्मी बुध विकली लॉटरी

सोडत संध्या. 4:45 वाजता
सोडत दर बुधवार • सोडत क्रमांक 21 • तिकीट किं. रु. 20/- • सोडत दिनांक 27/05/2026

पहिले बक्षिस रु. 10,000/- : **GL-03 : 1493**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 2127 | 2397 | 3086 | 4057 | 4120 | 4885 | 6131 (श्री सिद्धि समर्थ एजेंसी, दादर - मुंबई) | 7745 | 9199 | 9470 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0339 | 0741 | 1340 | 2394 | 2700 | 3308 | 3661 | 5140 | 5143 | 9672 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 0373 | 0524 | 1460 | 2182 | 3008 | 3218 | 3581 | 5769 | 7827 | 7846 |
| पाचवे बक्षिस रु. 200/- | 1850 | 1929 | 3736 | 4367 | 4583 | 5868 | 6818 | 6900 | 7829 | 9361 |

सहावे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1764 | 2298 | 3079 | 3775 | 4680 | 5472 | 6349 | 7180 | 8378 | 9049 |
| | | 1788 | 2320 | 3163 | 3834 | 4715 | 5510 | 6394 | 7187 | 8389 | 9072 |
| 0001 | 1101 | 1806 | 2422 | 3199 | 3934 | 4722 | 5515 | 6466 | 7247 | 8394 | 9089 |
| 0005 | 1107 | 1810 | 2471 | 3206 | 3940 | 4735 | 5545 | 6528 | 7279 | 8450 | 9189 |
| 0036 | 1115 | 1814 | 2494 | 3209 | 3972 | 4753 | 5558 | 6540 | 7442 | 8488 | 9248 |
| 0045 | 1128 | 1818 | 2520 | 3232 | 4084 | 4896 | 5568 | 6556 | 7494 | 8501 | 9260 |
| 0109 | 1132 | 1820 | 2523 | 3319 | 4108 | 4913 | 5651 | 6574 | 7539 | 8504 | 9369 |
| 0118 | 1145 | 1850 | 2574 | 3326 | 4234 | 4947 | 5715 | 6580 | 7577 | 8538 | 9392 |
| 0146 | 1180 | 1858 | 2605 | 3344 | 4244 | 5021 | 5717 | 6591 | 7658 | 8561 | 9403 |
| 0203 | 1218 | 1891 | 2621 | 3345 | 4280 | 5029 | 5728 | 6614 | 7716 | 8579 | 9666 |
| 0250 | 1269 | 1915 | 2656 | 3410 | 4306 | 5058 | 5765 | 6622 | 7767 | 8624 | 9691 |
| 0293 | 1272 | 1933 | 2711 | 3433 | 4345 | 5105 | 5859 | 6636 | 7893 | 8705 | 9694 |
| 0351 | 1333 | 1961 | 2770 | 3488 | 4348 | 5118 | 5898 | 6677 | 7901 | 8749 | 9750 |
| 0408 | 1351 | 1976 | 2801 | 3499 | 4352 | 5149 | 5926 | 6737 | 7917 | 8750 | 9824 |
| 0412 | 1391 | 1999 | 2837 | 3503 | 4438 | 5156 | 6060 | 6861 | 7979 | 8809 | 9894 |
| 0425 | 1422 | 2009 | 2882 | 3530 | 4439 | 5165 | 6116 | 6926 | 7999 | 8817 | 9897 |
| 0704 | 1467 | 2044 | 2938 | 3553 | 4454 | 5215 | 6126 | 6956 | 8081 | 8838 | 9912 |
| 0774 | 1508 | 2171 | 2960 | 3600 | 4495 | 5365 | 6136 | 6963 | 8085 | 8870 | 9950 |
| 0920 | 1519 | 2227 | 2972 | 3663 | 4510 | 5423 | 6186 | 7015 | 8089 | 8934 | 9952 |
| 1011 | 1614 | 2244 | 2988 | 3671 | 4547 | 5425 | 6268 | 7055 | 8090 | 8984 | 9959 |
| 1029 | 1619 | 2261 | 3037 | 3731 | 4558 | 5453 | 6329 | 7124 | 8164 | 8999 | 9990 |
| 1059 | 1762 | 2269 | 3066 | 3733 | 4591 | 5455 | 6335 | 7176 | 8202 | 9009 | 9993 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

# सांताक्रूझ डेपोतील बसला आग चालक केबिनमध्ये शॉर्टसर्किट

■ मुंबई

**मुंबईतील** सांताक्रूझ डेपोमध्ये बेस्टच्या बसला आग लागल्याची घटना घडली. चालकाच्या केबिनमध्ये शॉर्टसर्किट झाल्याने ही आग लागली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.

ही सांताक्रूझ डेपोतील बस क्लचमधील बिघाडामुळे डेपोमध्ये उभी करण्यात आली होती. दुरुस्तीचे काम पूर्ण झाल्यानंतर संबंधित चालक बस इंधन भरण्यासाठी डेपोतील पेट्रोल पंपाकडे घेऊन जात होते. पहाटे सुमारे २.४५ वाजण्याच्या सुमारास बस सुरू असताना चालकाच्या केबिनमध्ये अचानक शॉर्टसर्किट झाले आणि काही क्षणांतच आग लागली. आग लागल्याची माहिती मिळताच कर्मचाऱ्यांनी तातडीने धाव घेतली. आग नियंत्रणात आणण्यासाठी तब्बल २० अग्निशामक यंत्रांचा वापर करण्यात आला. कर्मचाऱ्यांच्या तत्परतेमुळे आग वेळीच आटोक्यात आणण्यात यश आले. त्यामुळे मोठी दुर्घटना टळली.

## निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी महाराष्ट्र सह्याद्री • विजयालक्ष्मी विकली लॉटरी •

सोडत सायं. 4:30 वाजता
सोडत दर बुधवार • सोडत क्रमांक 21 • तिकीट किं. रु. 15/- • सोडत दिनांक 27/05/2026

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- : **SV-04 : 4589** — हरी श्री लॉटरी सेंटर, नालासोपारा

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 2000/- | 1273 | 1468 | 1604 | 2454 | 4389 (महाराजा असोसिएट्स, इचलकरंजी) | 4730 (महावीर लॉटरी सेंटर,कोल्हापूर) | 5631 | 6713 | 7148 | 7348 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 2012 | 2854 | 3744 | 5260 | 7392 | 7476 | 7724 | 8748 | 8968 | 9399 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 0503 | 1093 | 1157 | 1811 | 6097 | 6700 | 7509 | 8299 | 8441 | 9798 |

पाचवे बक्षीस रु. 300/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 1597 | 2422 | 3713 | 4784 | 5945 | 6690 | 8004 | 8844 |
| | 1619 | 2551 | 3725 | 4804 | 6046 | 7026 | 8186 | 9036 |
| 0195 | 1891 | 2744 | 3919 | 5015 | 6069 | 7027 | 8308 | 9093 |
| 0214 | 1921 | 2803 | 3941 | 5195 | 6146 | 7037 | 8380 | 9128 |
| 0307 | 2066 | 2920 | 4090 | 5284 | 6174 | 7069 | 8392 | 9525 |
| 0624 | 2091 | 2922 | 4135 | 5294 | 6466 | 7364 | 8458 | 9656 |
| 0695 | 2231 | 3178 | 4303 | 5354 | 6486 | 7621 | 8466 | 9746 |
| 0702 | 2235 | 3250 | 4414 | 5408 | 6507 | 7670 | 8472 | 9789 |
| 0739 | 2237 | 3288 | 4450 | 5609 | 6534 | 7679 | 8484 | 9799 |
| 0825 | 2261 | 3430 | 4458 | 5703 | 6611 | 7716 | 8523 | 9930 |
| 1043 | 2269 | 3437 | 4498 | 5705 | 6660 | 7730 | 8581 | 9941 |
| 1387 | 2312 | 3544 | 4559 | 5754 | 6667 | 7781 | 8784 | 9952 |
| 1503 | 2366 | 3576 | 4783 | 5915 | 6678 | 7846 | 8840 | 9978 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## शुभ राशी ता. २८/५/२०२६

| | | |
|---|---|---|
| ३ | २ | ७ |
| ३२ | २३ | ७३ |
| ३७ | २८ | ७८ |
| १३९ | १३८ | १३३ |
| ४९० | ३४५ | ४६७ |

## महाराष्ट्र अक्षय विकली लॉटरी

महाराष्ट्र राज्य लॉटरी • सोडत दर बुधवारी • तिकीट किंमत रु. 50/- • सोडत क्र. 21 • सोडत दिनांक 27/05/2026

पहिले सामाईक बक्षिस रु. 7 लाख : **AK-03 : 1147**

| बक्षिस | | |
|---|---|---|
| प्रोत्साहनपर बक्षिस रु. 2500/- (पहिल्या बक्षीसाची विजेता मालिका सोडून इतर सर्व मालिकांसाठी) | 1147 | रुखमणी एन्टरप्रायझेस - औरंगाबाद |
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 1134 | रुखमणी एन्टरप्रायझेस - औरंगाबाद |

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 0462 | 1287 | 2828 | 3601 | 4583 | 6286 | 7229 | 7242 | 7466 | 9150 |
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 0219 | 0333 | 2105 | 2344 | 2939 | 3707 | 4542 | 4609 | 5079 | 8315 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 1312 | 1553 | 1722 | 2873 | 3110 | 3478 | 4086 | 7543 | 8725 | 8898 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 2200 | 2616 | 3340 | 4309 | 4482 | 5100 | 6383 | 8197 | 8225 | 8917 |

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1149 | 1812 | 2589 | 3390 | 4204 | 4914 | 5788 | 6495 | 7124 | 7747 | 8774 | 9302 |
| | | 1168 | 1876 | 2598 | 3392 | 4220 | 4929 | 5798 | 6499 | 7149 | 7748 | 8798 | 9323 |
| | | 1170 | 1881 | 2615 | 3402 | 4244 | 4967 | 5834 | 6505 | 7170 | 7760 | 8831 | 9360 |
| | | 1172 | 1918 | 2709 | 3414 | 4245 | 4977 | 5859 | 6541 | 7171 | 7767 | 8833 | 9380 |
| | | 1182 | 1943 | 2727 | 3453 | 4267 | 5005 | 5865 | 6553 | 7175 | 7773 | 8839 | 9397 |
| 0000 | 0589 | 1192 | 1969 | 2740 | 3454 | 4268 | 5032 | 5884 | 6565 | 7177 | 7833 | 8844 | 9423 |
| 0019 | 0610 | 1193 | 2003 | 2779 | 3458 | 4303 | 5066 | 5885 | 6584 | 7196 | 7856 | 8851 | 9437 |
| 0021 | 0622 | 1209 | 2022 | 2802 | 3517 | 4339 | 5072 | 5891 | 6604 | 7238 | 7859 | 8868 | 9470 |
| 0022 | 0633 | 1237 | 2042 | 2804 | 3593 | 4343 | 5085 | 5935 | 6612 | 7240 | 7875 | 8869 | 9481 |
| 0030 | 0658 | 1242 | 2096 | 2812 | 3641 | 4365 | 5121 | 5952 | 6640 | 7247 | 7878 | 8870 | 9495 |
| 0051 | 0664 | 1271 | 2098 | 2818 | 3652 | 4407 | 5135 | 5975 | 6646 | 7263 | 7907 | 8872 | 9499 |
| 0088 | 0678 | 1274 | 2103 | 2826 | 3656 | 4417 | 5143 | 5995 | 6650 | 7271 | 7978 | 8880 | 9503 |
| 0121 | 0700 | 1291 | 2124 | 2918 | 3715 | 4418 | 5169 | 6075 | 6664 | 7273 | 7993 | 8881 | 9559 |
| 0130 | 0701 | 1317 | 2125 | 2926 | 3716 | 4423 | 5170 | 6078 | 6669 | 7276 | 7995 | 8883 | 9577 |
| 0165 | 0705 | 1369 | 2149 | 2964 | 3725 | 4426 | 5201 | 6107 | 6680 | 7348 | 8004 | 8885 | 9633 |
| 0180 | 0714 | 1400 | 2158 | 2967 | 3739 | 4428 | 5218 | 6130 | 6681 | 7381 | 8021 | 8888 | 9654 |
| 0203 | 0715 | 1421 | 2182 | 2977 | 3743 | 4438 | 5249 | 6153 | 6696 | 7387 | 8024 | 8890 | 9677 |
| 0205 | 0730 | 1437 | 2184 | 2992 | 3753 | 4447 | 5285 | 6164 | 6702 | 7405 | 8038 | 8898 | 9771 |
| 0228 | 0761 | 1448 | 2201 | 3015 | 3765 | 4463 | 5303 | 6186 | 6718 | 7407 | 8050 | 8902 | 9810 |
| 0230 | 0850 | 1461 | 2205 | 3032 | 3768 | 4490 | 5340 | 6196 | 6746 | 7408 | 8128 | 8958 | 9813 |
| 0267 | 0880 | 1462 | 2208 | 3053 | 3802 | 4504 | 5350 | 6201 | 6771 | 7445 | 8147 | 8983 | 9814 |
| 0281 | 0885 | 1492 | 2209 | 3087 | 3822 | 4516 | 5351 | 6215 | 6774 | 7465 | 8175 | 9007 | 9829 |
| 0290 | 0897 | 1510 | 2221 | 3137 | 3826 | 4517 | 5408 | 6238 | 6788 | 7474 | 8183 | 9051 | 9848 |
| 0300 | 0900 | 1518 | 2248 | 3153 | 3834 | 4535 | 5458 | 6244 | 6792 | 7477 | 8218 | 9059 | 9879 |
| 0309 | 0925 | 1520 | 2250 | 3173 | 3903 | 4546 | 5485 | 6255 | 6815 | 7492 | 8285 | 9063 | 9898 |
| 0320 | 0938 | 1540 | 2252 | 3174 | 3926 | 4552 | 5493 | 6258 | 6826 | 7521 | 8298 | 9066 | 9909 |
| 0330 | 0987 | 1541 | 2259 | 3190 | 3938 | 4584 | 5509 | 6270 | 6867 | 7525 | 8348 | 9075 | 9911 |
| 0332 | 0995 | 1552 | 2266 | 3239 | 3939 | 4594 | 5525 | 6275 | 6869 | 7545 | 8368 | 9081 | 9915 |
| 0339 | 1014 | 1621 | 2274 | 3241 | 3941 | 4633 | 5545 | 6323 | 6907 | 7567 | 8385 | 9094 | 9937 |
| 0345 | 1031 | 1622 | 2324 | 3280 | 3943 | 4656 | 5555 | 6334 | 6916 | 7574 | 8412 | 9095 | 9946 |
| 0356 | 1035 | 1630 | 2325 | 3285 | 3973 | 4704 | 5575 | 6363 | 6925 | 7601 | 8473 | 9108 | 9950 |
| 0408 | 1049 | 1661 | 2328 | 3293 | 4003 | 4708 | 5581 | 6365 | 6968 | 7617 | 8486 | 9137 | 9956 |
| 0413 | 1059 | 1673 | 2342 | 3323 | 4024 | 4745 | 5651 | 6369 | 6975 | 7648 | 8540 | 9150 | 9965 |
| 0420 | 1071 | 1703 | 2353 | 3333 | 4034 | 4756 | 5657 | 6390 | 6989 | 7672 | 8548 | 9191 | 9972 |
| 0423 | 1084 | 1744 | 2366 | 3335 | 4044 | 4764 | 5662 | 6406 | 7017 | 7678 | 8587 | 9195 | 9976 |
| 0451 | 1091 | 1745 | 2399 | 3336 | 4089 | 4836 | 5667 | 6412 | 7057 | 7686 | 8619 | 9202 | 9979 |
| 0460 | 1109 | 1763 | 2421 | 3347 | 4115 | 4839 | 5670 | 6416 | 7072 | 7700 | 8688 | 9231 | 9982 |
| 0473 | 1110 | 1791 | 2426 | 3378 | 4143 | 4883 | 5695 | 6423 | 7089 | 7702 | 8731 | 9272 | 9986 |
| 0575 | 1112 | 1808 | 2462 | 3384 | 4186 | 4889 | 5733 | 6426 | 7096 | 7705 | 8758 | 9291 | 9993 |
| 0583 | 1114 | 1810 | 2532 | 3389 | 4187 | 4894 | 5780 | 6486 | 7106 | 7728 | 8771 | 9297 | 9998 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## लॉटरी

## निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी महाराष्ट्र गजराज मासिक सोडत

तिकीट किं. रु. 20/- • सोडत क्रमांक 05 • सोडत दिनांक 27/05/2026

पहिले बक्षिस रु. 9 लाख : **GJ-04 : 2221**

प्रोत्साहनपर बक्षिस रु. 2500/- (पहिल्या बक्षीसाची विजेता मालिका सोडून इतर सर्व मालिकांसाठी) : **2221** — बारड लॉटरी सेंटर - सोलापूर • चिराग एन्टरप्रायझेस - नाशिक • किशोर लॉटरी सेंटर, सांगली • महावीर लॉटरी सेंटर - कोल्हापूर • श्री सिद्धि समर्थ एजेंसी, दादर - मुंबई

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 5,000/- | 6356 | | | | | | | | | |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0506 | 4137 | 5515 | 7975 | 8538 | | | | | |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 1307 | 1565 | 2512 | 3952 | 5290 | 7451 | 7912 | 8226 | 9622 | 9696 |
| पाचवे बक्षिस रु. 200/- | 2112 | 2376 | 2583 | 2888 | 3040 | 4561 | 5949 | 6548 | 8996 | 9803 |

सहावे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1843 | 2438 | 3316 | 4147 | 5225 | 6067 | 6710 | 7270 | 7869 | 8741 |
| 0051 | 1130 | 1899 | 2482 | 3334 | 4225 | 5236 | 6086 | 6732 | 7272 | 7910 | 8784 |
| 0076 | 1132 | 1909 | 2512 | 3336 | 4280 | 5251 | 6111 | 6734 | 7310 | 7957 | 8823 |
| 0081 | 1135 | 1917 | 2601 | 3371 | 4296 | 5252 | 6115 | 6747 | 7337 | 8007 | 8921 |
| 0117 | 1143 | 1939 | 2656 | 3386 | 4343 | 5323 | 6116 | 6767 | 7343 | 8018 | 9030 |
| 0200 | 1169 | 2021 | 2676 | 3394 | 4351 | 5419 | 6127 | 6769 | 7357 | 8019 | 9092 |
| 0274 | 1180 | 2026 | 2710 | 3397 | 4405 | 5438 | 6167 | 6778 | 7367 | 8020 | 9180 |
| 0357 | 1182 | 2037 | 2760 | 3437 | 4406 | 5459 | 6216 | 6788 | 7376 | 8093 | 9391 |
| 0363 | 1186 | 2064 | 2779 | 3468 | 4427 | 5485 | 6352 | 6816 | 7397 | 8143 | 9448 |
| 0402 | 1198 | 2116 | 2835 | 3553 | 4429 | 5522 | 6379 | 6863 | 7449 | 8185 | 9495 |
| 0430 | 1261 | 2120 | 2838 | 3623 | 4504 | 5560 | 6476 | 6867 | 7457 | 8349 | 9500 |
| 0529 | 1349 | 2123 | 2893 | 3663 | 4538 | 5615 | 6596 | 6876 | 7477 | 8355 | 9504 |
| 0708 | 1450 | 2128 | 2940 | 3687 | 4653 | 5718 | 6605 | 6913 | 7518 | 8367 | 9638 |
| 0814 | 1531 | 2208 | 2965 | 3749 | 4745 | 5733 | 6614 | 6930 | 7607 | 8480 | 9842 |
| 0846 | 1568 | 2224 | 3039 | 3782 | 4788 | 5765 | 6631 | 6951 | 7635 | 8486 | 9883 |
| 0847 | 1594 | 2236 | 3091 | 3803 | 4884 | 5848 | 6637 | 6960 | 7647 | 8487 | 9902 |
| 0975 | 1622 | 2265 | 3180 | 3922 | 5005 | 5868 | 6661 | 7075 | 7687 | 8543 | 9906 |
| 1019 | 1645 | 2271 | 3193 | 3943 | 5054 | 5906 | 6665 | 7167 | 7718 | 8638 | 9919 |
| 1041 | 1653 | 2274 | 3230 | 4084 | 5074 | 6025 | 6667 | 7178 | 7736 | 8643 | 9964 |
| 1107 | 1774 | 2314 | 3242 | 4097 | 5075 | 6029 | 6674 | 7187 | 7768 | 8718 | 9970 |
| 1115 | 1832 | 2390 | 3248 | 4134 | 5122 | 6060 | 6675 | 7218 | 7798 | 8738 | 9986 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

# भारतरत्न महर्षी कर्वे

**व्यासपीठावर बसलेल्या डॉ. राजेंद्र प्रसादांची नजर रांगेतील एका खुर्चीकडे वारंवार जात होती. 'चटकन उठावं, व्यासपीठाच्या पायऱ्या उतरून पहिल्या रांगेतल्या त्या खुर्चीपर्यंत जावं, त्या खुर्चीवर बसलेल्या 'त्या तपस्वी महर्षीला वाकून वंदन करावं', असं त्यांच्या मनात पुन:पुन्हा येत होतं. पण हे करण्यासाठी नेमका कोणता क्षण पकडावा, हे त्यांच्या लक्षात येत नव्हते. त्या समारंभात कुठलाही व्यत्यय न येता राष्ट्रपतीपदाची प्रतिष्ठा सांभाळून त्यांना हे सारं करायचं होतं. समारंभ होता पुण्यात फर्ग्युसन महाविद्यालयात. महाविद्यालयाने ७५ वर्षांची वाटचाल पूर्ण केल्याबद्दल एक मोठा समारंभ आयोजित केला होता. त्यासाठी भारताचे राष्ट्रपती प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.**

डॉ. राजेंद्रप्रसाद भाषणासाठी उठले. पण ते जेव्हा माईककडे न जाता, व्यासपीठाच्या पायऱ्या उतरू लागले तेव्हा मात्र सारेच बुचकळ्यात पडले. राष्ट्रपती खाली उतरले. चालत चालत पहिल्या रांगेतल्या त्या विशिष्ट खुर्चीपर्यंत गेले आणि तिथे बसलेल्या त्या वयोवृद्ध व्यक्तीला वाकून नमस्कार केला त्यांनी!

'ती व्यक्ती कोण आहे,' हे तिथे हजर असलेल्या प्रत्येकाला माहीत असल्याने, तमाम पुणेकर जनतेने राष्ट्रपतींच्या या कृतीला पुन्हा एकदा प्रचंड टाळ्यांचा गजर करून मनमुराद दाद दिली. कारण, ती व्यक्ती म्हणजे




दुसरं तिसरं कुणीही नव्हतं तर साक्षात अण्णा होते. अण्णा म्हणजेच 'महर्षी धोंडो केशव कर्वे'!

खरेखुरे क्रियाशील सुधारक! महर्षी कर्वे म्हणजे सेवामूर्ती. वयाची सत्तरी ओलांडल्यानंतर हा आधुनिक व्यास आपल्या शिक्षण संस्थांना देणग्या मिळवण्यासाठी इंग्लंड, अमेरिका, जर्मनी, जपान या देशाच्या दौऱ्यावर निघाला होता. आगबोटीच्या खडतर प्रवासाने. हे पाहिलं की त्यांचं शिक्षण-प्रेम आणि सामाजिक सुधारणां बद्दलची त्यांची तळमळ लक्षात येते. खरंतर महर्षी कर्वे केवळ 'वाचावीर' नव्हते तर ते 'कर्मवीर' होते

आणि म्हणूनच 'आधी केले मग सांगितले' या न्यायाने त्यांनी आधी एका विधवेशी विवाह केला आणि मगच समाजाचा प्रचंड विरोध पत्करूनही विधवा विवाहासाठी विचार जागृतीचे अभियान चालू केले.

महाराष्ट्रात स्त्री शिक्षणाची मुहूर्त रोवणाऱ्या या महर्षीने पित्याच्या वात्सल्याने आपल्या प्रत्येक शिक्षण संस्थेचे भरण-पोषण केले होते.

फर्ग्युसन कॉलेजात लो.टिळक गणिताचे अध्यापन करीत असत. चळवळींमुळे त्यांना फर्ग्युसन कॉलेज मधून बाजूला व्हावे लागले, तेव्हा ती जागा महर्षी कर्वेंना मिळाली. टिळकांचा वारस म्हणून कर्वे यांनी फर्ग्युसन कॉलेजमध्ये सलग २३ वर्षे गणिताचं अध्यापन केलं. पुण्यातल्या



एस.एन.डी.टी. विद्यापीठाचे ते संकल्पक, संस्थापक, संघटक होते. आपल्या शिक्षण संस्थांवर अण्णांची किती प्रचंड माया होती आणि त्या संस्थांच्या उभारणीसाठी केवढी धडपड करीत होते ते पुढील प्रसंगावरून लक्षात येते.

सुप्रसिद्ध उद्योगपती सर विठ्ठलदास ठाकरसी यांना भेटून 'काही देणगी मिळतेय का' हे पाहण्यासाठी महर्षी एकदा त्यांच्या पुण्यातल्या बंगल्यावर गेले होते पायी चालत. पर्वतीच्या बाजूला त्यांचा बंगला. पण त्या काळात १०-१५ किलोमीटर चालण्याचं कर्वे यांना काहीच वाटत नसे. अगदी एक रुपया जरी देणगी मिळणार असेल, तर अण्णा ५-६ मैल जाऊन तो रुपया घ्यायला तयार असत!!

संस्था उभ्या राहतात, त्या अशा भगीरथांमुळे!

ठाकरसींना अण्णा भेटले, चर्चा झाली. ठाकरसींनी सुरुवातीला एक लाख देण्याचे आश्वासन तर दिलेच, पण पुढे अधिकाधिक देणगी देण्याचा संकल्पही व्यक्त केला.

अण्णांना खूप बरं वाटलं!

खूश होऊन ते परत निघाले. ठाकरसी म्हणाले, कसे जाणार परत घरी चालत!! अण्णा म्हणाले. म्हणजे? आलात कसे अण्णा? ठाकरसींनी विचारलं..

कसे म्हणजे? चालतच आलोय मी? अण्णांच हे उत्तर ऐकून ठाकरसी अवाक्‌च झाले. सात-आठ मैल चालत आलेले अण्णा पुन्हा सात-आठ मैल, भर उन्हात चालत जाणार होते!

नाही नाही अण्णा, तुम्ही चालत जाऊ नका, हे दोन रुपये घ्या आणि टांग्याने घरी जा! ठाकरसींनी बजावले.

बरं ! बरं !

असं म्हणून अण्णा उठले आणि बाहेर पडले. पण ठाकरसींना चैन पडेना. 'एकेका रुपयासाठी धडपडणारे अण्णा टांग्यासाठी दिलेले दोन रुपये सुद्धा संस्थेच्या मदत निधीत भरतील आणि स्वतः चालत जातील,' असं त्यांना राहून राहून वाटत होतं! म्हणूनच त्यांनी ड्रायव्हरला बोलावले आपल्या आणि त्याला सांगितले, पटकन जा, आत्ता जे गृहस्थ आपल्या बंगलयातून बाहेर पडलेत, ते टांग्याने जात असतील तर परत ये. पण जर ते चालत जाताना दिसले, तर त्यांना आपल्या गाडीतून एरंडवण्याला सोडून ये. ड्रायव्हरने लगबगीने गाडी काढली, रस्त्यावर आणली. थोडेसे अंतर जातो न जातो, तोच त्याला दिसलं, अण्णांची कृश मूर्ती रस्त्यावरून सावकाश चालत एरंडवण्याकडे निघाली होती! मला सांगा, राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद अशा ऋषितुल्य व्यक्तीला खुर्चीवरून उठून व्यासपीठ सोडून नमस्कार करायला आले तर त्यात नवल ते कसलं! त्यावेळी महर्षी कर्वे याचं वय होतं १०१ वर्षे!! नुकताच त्यांना भारतरत्न पुरस्कार मिळाला होता. बर्लिनमध्ये साक्षात आईनस्टाईनला भेटणारा हा पहिला महाराष्ट्रीयन महापुरूष!!...

# एमएमआरडीए २ मेट्रो प्रकल्पासाठी तब्बल ९९५० कोटींचे कर्ज घेणार

■ मुंबई

**एमएमआरडीएने** दुर्गाडी-कल्याण- भोईवाडा-उल्हासनगर या मेट्रो मार्ग १३अ आणि मानपाडा-खुटीरगाव मेट्रो मार्ग १२ अ या प्रकल्पांसाठी ९,९५० कोटी रुपयांच्या दीर्घकालीन कर्जासाठी बँका आणि वित्तीय संस्थांकडून निविदा मागवल्या आहेत. या दोन्ही मेट्रो मार्गिका एमएमआर क्षेत्रात प्रवाशांची सोय अधिक सुलभ आणि वेगवान करण्यासाठी उभारल्या जात आहेत.

हे कर्ज वेगवेगळ्या टप्प्यांत वितरित केले जाईल आणि प्रत्येक टप्प्यासाठी किमान ५० कोटी रुपयांची रक्कम निश्चित केली जाईल. हा निधी दुर्गाडी-कल्याण आणि भोईरवाडी ते



उल्हासनगरला जोडणाऱ्या मेट्रो मार्ग '५-अ' आणि तळोजा येथील मानपाडा, कल्याण फाटा आणि खुटारगाव यांना जोडणाऱ्या मेट्रो मार्ग '१२-अ' या दोन्ही महत्त्वाच्या प्रकल्पांसाठी वापरला जाईल. तसेच हे प्रस्तावित कर्ज 'रुपया मुदत कर्ज' स्वरूपात असेल. ही वित्तीय मदत एखादी एकल बँक किंवा बँकांच्या समूहाद्वारे केली जाऊ शकते.

या कर्जाचा एकूण कालावधी २५ वर्षांचा असेल, ज्यामध्ये कर्ज वितरणाच्या तारखेपासून मुद्दल आणि व्याजावरील पाच वर्षांच्या सवलतीचा समावेश आहे. त्यानंतर पुढील २० वर्षांच्या कालावधीत या कर्जाची परतफेड करावी लागेल.

# परळीत शिंदे गटाच्या माजी तालुकाध्यक्षावर हल्ला

■ बीड

**बीड** जिल्ह्यातील परळी येथे शिंदे गटाचे माजी तालुकाध्यक्ष तथा दादाहरी वडगावचे माजी सरपंच शिवाजी शिंदे यांच्यावर भरदिवसा कोयता आणि इतर धारदार शस्त्रांनी जीवघेणा हल्ला करण्यात आला. या घटनेमुळे परळी शहरात मोठी खळबळ उडाली असून, मोंढा परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

काल दुपारी साडेतीन वाजण्याच्या सुमारास शिवाजी शिंदे हे त्यांच्या पत्नीसमवेत मोंढा भागातील रिद्धी-सिद्धी हॉटेलमध्ये उपस्थित होते. त्यावेळी काही युवक अचानक हॉटेलमध्ये घुसले. सुरुवातीला त्यांनी शिवीगाळ करत शिंदे यांच्याशी वाद घातला आणि त्यानंतर कोयता व इतर शस्त्रांनी त्यांच्यावर हल्ला चढवला. या हल्ल्यात शिवाजी शिंदे गंभीर जखमी झाले असून, त्यांच्या हाताच्या बोटांना दुखापत झाली आहे. तसेच पाय आणि शरीराच्या इतर भागांवरही वार करण्यात आले आहेत. हॉटेलमधील नागरिक आणि कर्मचाऱ्यांनी तत्काळ हस्तक्षेप केल्यामुळे शिवाजी शिंदे यांचा जीव थोडक्यात बचावला. हल्ल्यानंतर रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या शिंदे यांना तातडीने परळी उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले.

# मनोज जरांगेंची आंदोलनाबाबत आज अंतरवालीत पत्रकार परिषद



■ जालना

**मराठा** आंदोलनाचे नेते मनोज जरांगे-पाटील हे उद्या सकाळी १०.३० वाजता अंतरवाली सराटी येथे पत्रकार परिषद घेणार आहेत. या पत्रकार परिषदेत ३० मेपासून होणाऱ्या नियोजित आंदोलनाबाबत मोठी घोषणा होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

भाजपा आमदार प्रसाद लाड यांनी २२ मे रोजी अंतरवाली सराटी येथे जाऊन मनोज जरांगे-पाटील यांची भेट घेतली. मराठा समाजाच्या मागण्या मान्य करण्यासाठी सरकार सर्वतोपरी प्रयत्न करेल, अशी ग्वाही देत त्यांनी जरांगेंना आंदोलन मागे घेण्याची विनंती केली. मनोज जरांगे आपल्या भूमिकेवर ठाम राहिल्याच. प्रसाद लाड यांनी मागण्या मान्य करण्यासाठी सरकारला काही दिवसांची मुदत देण्याची विनंती केली. त्यानंतर जरांगेंनी सरकारला २८ मेपर्यंतची अंतिम मुदत दिली. या कालावधीत मागण्या मान्य झाल्या नाहीत, तर पूर्वनियोजित कार्यक्रमानुसार ३० मेपासून उपोषण आंदोलन सुरू करण्यात येईल, असा इशारा जरांगे यांनी दिला आहे. उद्याच्या पत्रकार परिषदेत याबाबत घोषणा होण्याची शक्यता आहे.

# नायगाव बीडीडी चाळीची लॉटरी रद्द केल्याने रहिवाशांचे आंदोलन

■ मुंबई

**नायगाव** बीडीडी चाळ पुनर्विकासअंतर्गत २६ एप्रिलला १०१९ रहिवाशांना सोडतीद्वारे पुनर्वसित इमारतीतील घराची हमी म्हाडाच्या मुंबई मंडळाकडून देण्यात आली होती. मात्र परवा सोमवारी अचानक ही सोडत मुंबई मंडळाने रद्द केली. त्यामुळे बीडीडी चाळ क्रमांक ३ व ४ मधील रहिवाशांनी या निर्णयाच्या निषेधार्थ काल वांद्रे येथील म्हाडा कार्यालयासमोर जोरदार आंदोलन केले. तसेच म्हाडाने पुन्हा लॉटरी काढल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला.

या आंदोलनावेळी पुन्हा काढली जाणारी दुसरी लॉटरी आम्हाला मान्य नाही. रहिवाशांच्या हक्कावर अन्याय करणारा हा निर्णय रद्द करण्यात यावा, असा मजकूर बॅनरवर लिहिला होता. नायगाव बीडीडी चाळ क्रमांक १-अ ते ७-अ आणि १३-अ ते १९-अ मधील नव्या घराची लॉटरी २७ एप्रिल रोजी काढण्यात आली होती. मात्र, रहिवासी व लोकप्रतिनिधी यांची मागणी निवेदनाच्या अनुषंगाने वरिष्ठ स्तरावर निर्णयानुसार ही लॉटरी रद्द करण्यात आली. नवी लॉटरी २७ मे रोजी सकाळी ११.३० वाजता म्हाडा मुख्यालयात काढण्यात येणार होती.

# नीट पेपरफुटी विरोधात मंत्रालयासमोर राष्ट्रवादीच्या महिलांचे तीव्र आंदोलन

**'इंटिग्रेटेड क्लासेस' बंद करण्याची मागणी**

■ मुंबई

**शरद** पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने मंत्रालयासमोर आज सकाळी अचानक आंदोलन सुरू केले. हे आंदोलन नीट परीक्षा पेपरफुटी प्रकरणाच्या विरोधात करण्यात आले. शरद पवार गटाच्या नेत्या सक्षणा सलगर यांच्या नेतृत्वात कार्यकर्त्यांनी मंत्रालयाला धडक दिली. यावेळी या महिला कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी करत निदर्शने केली.

अचानक झालेल्या या आंदोलनामुळे पोलिसांचीही तारांबळ उडाली. पोलिसांनी या आंदोलकांना पांगवण्याचा प्रयत्न केला. पण आंदोलक अधिकच आक्रमक झाले. काही आंदोलकांनी रस्त्यावर बसून ठिय्या आंदोलन सुरू केले. केंद्र सरकारविरोधात जोदार घोषणाबाजी केली. त्यामुळे पोलिसांनी या सर्व आंदोलकांची धरपकड करत त्यांना व्हॅनमध्ये बसवले. तर कोचिंग क्लासेसच्या होत असलेल्या बदनामीविरोधात 'महाराष्ट्र क्लास ओनर्स असोसिएशन'ने मुंबईतील आझाद मैदानावर स्वतंत्र आंदोलन सुरू केले आहे. कॉर्पोरेट आणि शाळा-कॉलेजांशी संलग्न असलेले 'इंटिग्रेटेड क्लासेस' बंद करावेत, अशी मागणी ही संघटना करत आहेत. इंटिग्रेटेड क्लासेसमुळे पेपरफुटीची प्रकरणं समोर येत असल्याचा दावा या कोचिंग क्लासेस शिक्षकांनी केला आहे. कॉर्पोरेट क्लासेस आणि कॉलेज त्यासोबतच शाळांना संलग्न असलेल्या इंटिग्रेटेड कॉलेजचा कोचिंग क्लासेस संघटना विरोध करणार असून हे इंटिग्रेटेड कॉलेज बंद करण्याची सरकारकडे मागणी केली आहे. जे शिक्षक एखाद्या कॉलेज आणि शाळांमध्ये शिकवतात, त्यांना कोचिंग क्लासेसमध्ये शिकवण्यास परवानगी मिळू नये, असे या कोचिंग क्लासेस संघटनांचे म्हणणे आहे. अशा इंटिग्रेटेड आणि कॉर्पोरेट क्लासेसमुळे पेपरफुटीचा प्रकार वाढत असल्याचे कोचिंग क्लासेस मालकांचे म्हणणे आहे.

# रेल्वे स्थानकावरील पदार्थ दरवाढीचा निर्णय मागे

■ मुंबई

**प्रवाशांसाठी** मोठा दिलासा देणारा निर्णय घेत मध्य रेल्वेने १ जूनपासून लागू होणारा खाद्यपदार्थांच्या दरवाढीचा निर्णय मागे घेतला आहे. त्यामुळे रेल्वे स्थानकांवरील खाद्यपदार्थांचे दर सध्या तरी जैसे थेच राहणार आहेत.

मध्य रेल्वेकडून वडापाव, समोसा आणि इतर स्नॅक्सच्या दरात वाढ करण्याचा प्रस्ताव मांडला होता. या प्रस्तावानुसार १ जूनपासून १३ रुपयांचा वडापाव २० रुपयांपर्यंत महागणार होता. व्हेज समोसा, व्हेज पफ आणि साबुदाणा वडा यांचे दरही २० रुपये करण्यात येणार होते. पावभाजी आणि व्हेज पिझ्झा ५० रुपयांना, तर मसाला डोसा ३५ रुपये आणि दोन इडली ३० रुपयांना देण्याचा विचार होता. मात्र, या दरवाढीमुळे प्रवाशांच्या खिशावर अतिरिक्त भार पडणार असल्याने तीव्र नाराजी व्यक्त होत होती. त्यानंतर मध्य रेल्वेने हा निर्णय स्थगित केला आहे.

# कुलर नसल्याची मुख्यमंत्र्यांकडे तक्रार विद्यार्थिनीला वसतिगृह सोडण्याची नोटीस



■ नागपूर

**नागपुरातील** बेसा परिसरातील क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले शासकीय वसतिगृहातील विद्यार्थिनी आकांक्षा उके हिला वसतिगृह सोडण्याची नोटीस बजावण्यात आल्याने मोठी खळबळ उडाली आहे. वसतिगृहात कुलर आणि इतर मूलभूत सुविधांचा अभाव असल्याची तक्रार थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केल्यानंतर प्रशासनाने सूडबुद्धीने ही कारवाई केल्याचा आरोप होत आहे.

या प्रकारानंतर नागपूरचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी तातडीने हस्तक्षेप केला. त्यांनी आकांक्षा उके हिच्याशी संपर्क साधून तुला वसतिगृह सोडण्याची गरज नाही, सरकार तुझ्या पाठीशी आहे. दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई होईल, असे आश्वासन दिले. विद्यार्थिनीला वसतिगृहामधून काढण्याबाबत काढलेली नोटीस तत्काळ रद्द करण्याचे निर्देश त्यांनी दिले. वसतिगृहातील सुरक्षा व्यवस्था कडक करण्यासाठी तत्काळ उपाययोजना करण्याचे आदेशही दिले आहेत.

अतिशय गरीब शेतकरी कुटुंबातील आकांक्षा उके ही नागपुरातील शासकीय सावित्रीबाई फुले वसतिगृहात राहून शिक्षण घेत आहे. नागपुरातील तीव्र उष्णतेमुळे विद्यार्थिनींना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. वसतिगृहात कुलर आणि इतर आवश्यक सुविधा नसल्याने आकांक्षाने ४ मे आणि ८ मे रोजी थेट मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन तक्रार मांडली होती. या तक्रारीची गंभीर दखल घेत मुख्यमंत्र्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना फटकारले होते. विद्यार्थ्यांना आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देण्याच्या सूचनाही त्यांनी प्रशासनाला दिल्या होत्या. त्यानंतर वसतिगृह प्रशासनाने आकांक्षा उके हिला नोटीस बजावत ती नोकरदार असल्याचा ठपका ठेवला आणि तिला वसतिगृह सोडण्यास सांगितले होते.

# पूरपरिस्थिती रोखण्यासाठी धारण तलावांचा ४०० कोटींचा प्रस्ताव

■ विरार

**पूरनियंत्रणासाठी** वसई-विरार महापालिकेतर्फे नालासोपारा येथे धारण तलाव (होल्डिंग पोन्ड्स) विकसित करण्यासाठी नव्याने ४०० कोटींचा प्रस्ताव तयार केला जाणार आहे. मागील काही वर्षांपासून वसई-विरारमध्ये पावसाळ्यात पूरस्थिती निर्माण होत असते. त्यामुळे या पूरस्थितीवर तोडगा निघावा यासाठी महापालिकेने राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी संशोधन संस्था (निरी), भारतीय तंत्रज्ञान संस्था (आयआयटी) या सत्यशोधन समित्यांची नियुक्ती केली होती.

त्यांनी धारण तलाव तयार करण्याची सूचना दिली होती. त्यानुसार महापालिकेने नालासोपारा पश्चिमेच्या नीळेमोरे येथे १९ हजार ८६०.६४ चौरस मीटर इतक्या क्षेत्रात धारणतलाव तयार करण्याचे निश्चित करण्यात आले होते.

# नाशिकच्या कश्यपी धरणात दाम्पत्यासह चौघांचा बुडून मृत्यू

■ नाशिक

**नाशिकच्या** हरसूल रस्त्यावरील कश्यपी धरणाजवळ सुट्टीसाठी गेलेल्या चौघांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला आहे. या दुर्घटनेत मखमलाबाद येथील सचिन कैलास ठोंबरे (३२), त्यांची गरोदर पत्नी रोहिणी ठोंबरे तसेच केतन पवार (१६) आणि कौशल्य पवार (१४) या दोघा अल्पवयीन मुलांचा मृत्यू झाला.

हे सर्व सुट्टीच्या निमित्ताने कश्यपी धरण परिसरात फिरण्यासाठी गेले होते. ते पाण्यात उतरले असता ही घटना घडली. संगीता घाडगे या महिलेने प्रसंगावधान राखत ठोंबरे दाम्पत्याच्या दोन वर्षांच्या मुलीला पाण्यात जाण्यापासून वाचवले. लहान मुलगी रडत पाण्याकडे बोट दाखवत असल्याचे पाहून त्यांनी तत्काळ धाव घेत तिला सुरक्षित बाहेर काढले. घटनेची माहिती मिळताच धरणालगतच्या खाड्याची वाडी व धोंडेगाव येथील तरुणांनी तातडीने धरणात उड्या घेत शोधमोहीम सुरू केली. मोठ्या धाडसाने त्यांनी चौघांना बाहेर काढले. मात्र तोपर्यंत त्यांचा मृत्यू झाला होता. सचिन ठोंबरे हे व्यावसायिक सिव्हिल इंजिनिअर असून, मूळचे संगमनेर तालुक्यातील पिंपरणे येथील रहिवासी होते. दोन वर्षांपूर्वी ते नाशिकमधील मखमलाबाद परिसरात वास्तव्यास आले होते.

# एटीएमचे व्यवहार महागणार परिचालन खर्चात २० टक्के वाढ



■ मुंबई

**इंधन** दरवाढ आणि महागाईमुळे एटीएम रोकड वाहतूक कंपन्यांचा परिचालन खर्च २० टक्क्यांनी वाढला आहे. यामुळे कॅश लॉजिस्टिक क्षेत्रातील कंपन्यांनी बँकांकडे एटीएम कॅश लोडिंग शुल्कात म्हणजेच त्यांच्या मानधनात वाढ करण्याची मागणी केली आहे.

यासंदर्भात 'इंडियन बँक्स असोसिएशन'ला कॅश लॉजिस्टिक उद्योग क्षेत्रातील शिखर संस्था 'करन्सी सायकल असोसिएशन'ने पत्र लिहून शुल्कांची पुनर्रचना करण्याची मागणी केली आहे. असोसिएशनने म्हटले आहे की, इंधनाच्या किमती वाढल्या आहेत आणि सातत्याने उच्च पातळीवर आहेत, ज्याचा थेट परिणाम कॅश व्हॅनच्या वाहतूक खर्चावर होत आहे. तसेच अनेक महत्त्वाच्या राज्यांमध्ये किमान वेतनात वाढ करण्यात आली आहे.

मागणीनुसार रोकड भरणे यांसारख्या कार्यक्षम उपायांनी मदत होईल. परंतु ते या प्रमाणावरील खर्चवाढीची भरपाई करू शकत नाहीत. हा अतिरिक्त भार यापुढे सहन करणे शक्य नाही. त्यामुळे आमच्या बँकिंग भागीदारांसोबत वेळेत दरांची पुनर्रचना करणे आवश्यक आहे, असे असोसिएशनचे सरचिटणीस यू. एस. पालिवाल यांनी म्हटले आहे.

# वन्यप्राणी-मानव संघर्ष रोखण्यासाठी कोटींचा खर्च

■ मुंबई

**राज्यात** वन्यप्राणी आणि नागरिक यांच्यातील संघर्षाच्या घटना वाढत असल्याने महाराष्ट्र सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. यासाठी एआय म्हणजेच कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित योजनेवर २७० कोटी खर्च केले जाणार आहेत. वनक्षेत्राजवळील सुमारे १,००० गावांमध्ये ही आधुनिक सतर्कता प्रणाली बसवली जाणार आहे. यामुळे वन्यप्राण्यांच्या हालचालींची माहिती लोकांना वेळेवर मिळेल आणि धोका टाळता येईल असे सांगण्यात येते.

हा निर्णय वनमंत्री गणेश नाईक यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत घेण्यात आला. वन्यप्राण्यांच्या हल्ल्यांपासून लोकांचे संरक्षण करणे हा योजनेचा मुख्य उद्देश आहे. या योजनेत राज्यात १० नियंत्रण कक्ष उभारले जातील. हे कक्ष वन विभागाच्या गस्त पथकांवर आणि वाहनांवर लक्ष ठेवतील.

# मुलुंडच्या डम्पिंग ग्राऊंडला आखातातील युद्धाचा फटका

**डिझेल टंचाईमुळे कामाचा वेग मंदावला**

■ मुंबई

**अमेरिका,** इस्त्रायल आणि इराण यांच्यातील युद्धजन्य परिस्थितीमुळे देशभरात डिझेल टंचाई निर्माण झाली आहे. या डिझेल टंचाईचा मोठा फटका मुलुंड डम्पिंग ग्राऊंडवरील कचरा विल्हेवाटीच्या प्रक्रियेला बसला आहे. इंधनाचा पुरवठा विस्कळीत झाल्यामुळे शास्त्रोक्त पद्धतीने कचरा नष्ट करण्याच्या बायो-मायनिंगच्या कामाचा वेग मंदावला होता.

मुलुंड डम्पिंग ग्राऊंडची कचरा साठवण क्षमता ही ७० लाख मेट्रिक टन आहे. या डम्पिंग ग्राऊंडमधील कचऱ्यावर प्रक्रिया करून त्याची विल्हेवाट लावण्याचे काम सहा वर्षांसाठी कंत्राटदाराला देण्यात आले होते. कोरोना काळात पहिले काही महिने काम थांबल्याने कंत्राटदाराला मुदतवाढ दिली होती. त्यामुळे जून २०२५ पर्यंत कचरा विल्हेवाटीची मुदत कंत्राटदाराला दिली होती. यासाठी कंत्राटदारांसोबत प्रत्येक टनामागे ७९८ रुपये याप्रमाणे ५५८ कोटी रुपयांचा कराराही केला. मात्र त्या मुदतीत कंत्राटदाराने काम पूर्ण केले नाही. त्यानंतर पावसाळ्यात कचरा विल्हेवाटीचे काम थांबवण्यात आले. पावसाळा संपताच काम पुन्हा सुरू केले. तोपर्यंत मुदतवाढीची चर्चा कंत्राटदारासोबत सुरुच होती.

डिसेंबर २०२५ पर्यंत ७० लाख मेट्रीक टनपैकी ४९ लाख मेट्रीक टन कचऱ्याची विल्हेवाट लावण्यात आली होती. अखेर कंत्राटदाराला एप्रिल २०२६ पर्यंत मुदतवाढ देऊन कचऱ्याची विल्हेवाट लावण्याचे उद्दिष्ट दिले. फेब्रुवारी २०२६ पर्यंत एकूण ७० लाख मेट्रिक टनपैकी ५५ लाख मेट्रिक टन कचऱ्याची विल्हेवाट लावण्यात आली होती.

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# अंतर्गत सुरक्षेला आव्हान ठरणारे टाईमबॉम्ब

सरकारने दहशतवाद, नक्षलवाद संपुष्टात येत असल्याच्या वारंवार गर्जना केल्या आहेत. परंतु गेल्यावर्षीचा पहलगाम हल्ला आणि त्यानंतर दिल्लीतल्या लाल किल्ल्याजवळ झालेला कार बॉम्बस्फोट या दोन्ही घटनांमधून देशातील अंतर्गत सुरक्षिततेपुढे एक मोठे छुपे आव्हान कायम असल्याचे लक्षात आले. देशातल्या अनेक मोठ्या शहरांमध्ये उच्चशिक्षित म्हणजेच डॉक्टर, इंजिनिअर असलेल्या तरुणांचा या छुप्या कटासाठी उपयोग करून घेण्याची नवी मोडस ऑपरेंडी कार्यरत झाल्याचे लक्षात आले. दिल्ली बॉम्बस्फोटासंबंधात चार डॉक्टर्सना झालेली अटक आणि त्यात एका महिला डॉक्टरचा असलेला समावेश यावरून इस्लामिक टेरर रिक्रूट नावाची एक नवी खेळी देखील खेळली गेली. विशेषतः पाकिस्तानातल्या जैश-ए-मोहम्मद या संघटनेच्या मोर्चाने भारत विरोधी कारवाया कधीच थांबणार नाहीत. असे जाहीर वक्तव्य करून यासाठी भारतातील उच्चशिक्षित तरुण-तरुणींनी पुढाकार घेण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी म्हटले होते. त्याच्या या आवाहनानंतर पुढच्या महिनाभरातच दिल्लीतला बॉम्बस्फोट घडून आला होता. त्यानंतर देशभर बऱ्याच ठिकाणी छापे टाकले गेले आणि वेगवेगळ्या नावाने वेगवेगळ्या पद्धतीने भारतविरोधी कारवाया गुप्तपणे सुरू असल्याचे उघड होत गेले. देशाच्या अनेक भागांमध्ये गेल्या वर्षभरात वाढलेली शस्त्रतस्करी आणि अशी दहशतवादी कृत्ये करणाऱ्यांविषयी असलेली सहानुभूती त्यासाठी जमा केला जात असलेला पैसा एकाचवेळी वेगवेगळ्या आघाड्यांवर काही ना काही कारवाया करून अस्थिरता माजवण्याचे प्रयत्न ज्यामध्ये कॉर्पोरेट जिहाद शिवाय गावागावात वेगवेगळी आमिषे दाखवून राबवला जात असलेला लव्ह जिहादचा प्रयोग या सर्व कारवायांचा एकत्रित विचार केला तर ही सगळी कटकारस्थाने म्हणजे देशात कार्यरत असलेले छुपे टाईमबॉम्ब ठरतात. त्यांचा केव्हाही आणि कुठल्याही पद्धतीने स्फोट घडवून आपला हेतू साध्य केला जातो. या सगळ्या प्रकाराची गंभीरता आता केंद्र सरकारच्याही लक्षात आलेली आहे. म्हणूनच सीमासुरक्षेपासून देशातील प्रशासन आणि देशातील नागरिकांपर्यंत एक बहुपदरी फोर पाईंट सिक्युरिटी ग्रीड उभारली जाते आहे. यासाठी ड्रोनचा वापर करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

**वाढती शस्त्रतस्करी**

अंतर्गत सुरक्षेपुढच्या या आव्हानांमध्ये तंत्रज्ञानाचाही समाजकंटकांकडून मोठा वापर होतो आहे. शस्त्र, ड्रग किंवा मादक पदार्थांच्या तस्करीसाठीसुद्धा ड्रोनसारख्या तंत्राचा वापर होतो आहे. बऱ्याच वेळेला सायबर फ्रॉडच्या माध्यमातून पैसाही जमा केला जातो. देशाच्या विशिष्ट भागांमध्ये विशिष्ट पद्धतीने आणि ठराविक लोकांकडूनच ही सगळी देशविरोधी कृत्ये होत आहेत. त्यांच्या या नेटवर्कचा जसजसा तपास होत गेला तसतसा हे नेटवर्क सगळ्या प्रकारच्या अवैध धंद्यांमध्ये पुढाकार घेत असल्याचेही स्पष्ट झाले. सीमावर्ती भागात ड्रग, बनावट नोटा, आणि काही ठिकाणी जाणीवपूर्वक त्या भागातील तरुणांना पैशाचे आमिष दाखवून दहशतवादाकडे ओढण्याचा होत असलेला प्रयत्न म्हणजे एक सुनियोजित षड्यंत्र म्हणावे लागते. या सगळ्या प्रकाराची व्याप्ती खूपच मोठी आहे. काही ठिकाणी धार्मिक आणि सामाजिक उपक्रमांच्या नावाखाली आपले उद्दिष्ट साध्य करून घेण्याचेही प्रयत्न केले जातात. उत्तर प्रदेश, आसाम, महाराष्ट्र, केरळ, तामिळनाडू या राज्यांमधल्या अनधिकृत झोपडपट्ट्या किंवा वसाहतींचा अतिशय काळजीपूर्वक वापर केला जात होता. मुळातच या सगळ्या वस्त्या अनधिकृत अवैध बांधलेल्या आहेत आणि तिथे कोणाच्याही लक्षात येणार नाही अशा पद्धतीने वेगवेगळ्या बेकायदेशीर गोष्टींना प्रोत्साहन दिले जाते. अगदी मुंबईतल्या नुकत्याच पाडल्या गेलेल्या गरीब नगरचाही याच पद्धतीने वापर केला जात असल्याची बाब समोर आली होती. अमरावतीतल्या परतवाडा येथेसुद्धा मुलींना जाळ्यात ओढणाऱ्या लव्ह जिहाद प्रकार करणाऱ्या एका तरुणाचे बांधकामही अवैध होते म्हणून ते पाडले गेले. उत्तरप्रदेशात तर अशा अनेक देश आणि समाजविरोधी काम करणाऱ्या अवैध बांधकामांवर बुलडोझर फिरवण्याची वेळ आली. हे सगळे उपाय करूनही देशाच्या अनेक भागांमध्ये अंतर्गत सुरक्षिततेला धक्का पोहोचवणाऱ्या छोट्या मोठ्या अनेक गोष्टी सुरू आहेत. जणू काही भविष्यकाळात देशात मोठी अस्थिरता घडवून आणण्याचाच तो कट वाटू लागतो. म्हणजे कटकारस्थानाच्या या गमजा तयार करून ठेवल्या जात आहेत. त्यावर फक्त काडी टाकण्याचा अवकाश त्या गंजा लगेच पेट घेऊ शकतील.

**म्हणून तंत्रज्ञानाची गरज**

ज्या छुप्या पद्धतीने ही सगळी कारस्थाने सुरू आहेत त्यावर लक्ष ठेवण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारच्या गुप्तचर यंत्रणा पुऱ्या पडू शकत नाहीत. म्हणून आता चार कलमी सुरक्षिततेची व्यवस्था उभी केली जात आहे. ज्यामध्ये ड्रोनचा वापर आणि एआय तंत्रज्ञानाचा प्रभावी उपयोग सुरू झाला आहे. खरे तर यासंबंधीची उपाययोजना अतिशय वेगाने प्रत्यक्षात आली पाहिजे. आज जरी नक्षलवाद संपल्यासारखे वाटत असले किंवा दहशतवादावर नियंत्रण आल्यासारखे चित्र दिसले तरी प्रत्यक्षात वस्तुस्थिती वेगळी आहे. कारण वेगवेगळ्या प्रकारातून सामाजिक स्तरावरची अस्वस्थता कायम ठेवणे आणि एकूणच देशाच्या संविधानिक ढाच्याला धक्का पोहोचवण्याचेच प्रयत्न सुरू असल्याचेच दिसते. शत्रूराष्ट्राकडून होणाऱ्या धोक्यांबाबत सैन्यदलं जागरूक आहेत. परंतु सीमेवरच्या युद्धाइतकीच देशांतर्गत छुप्या युद्धाची गंभीरताही लक्षात घेतली गेली आहे. आतापर्यंत ज्यांच्या संरक्षणाखाली ही अवैध कृत्ये सुरू होती. त्यांच्याही नाड्या आवळल्या जात आहेत. महाराष्ट्रातच गेल्या आठवड्यात सापडलेले अवैध शस्त्रसाठे हेसुद्धा याच अंतर्गत सुरक्षेपुढची आव्हाने ठरतात. खरे तर राज्य स्तरावर अधिक व्यापक पद्धतीने सुरक्षा व्यवस्था मजबूत करण्याची गरज आहे. विशेषतः ड्रग तस्करी आणि युक्त्या-प्रयुक्त्या करून केले जात असलेले धर्मांतराचे प्रयत्न वेळीच रोखायला हवेत. अन्यथा वर म्हटल्याप्रमाणे हे छुपे टाईमबॉम्ब गंभीर धोके निर्माण करू शकतात.

## सुविचार


**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

प्रामाणिकपणे काम करणाऱ्या व्यक्तीला
दोन बक्षीसे हमखास मिळतात.
एक म्हणजे विरोध आणि दुसरे म्हणजे टीका.

## पंचांग

**गुरुवार, २८ मे २०२६**
**शक १९४८ पराभवनामसंवत्सर**

*** अधिक ज्येष्ठ शुक्ल द्वादशी**
**नक्षत्र : चित्रा**



**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते २४-०० तूळ**

**रवी उदय- ०६-०२**
**रवी अस्त- १९-१०**

**प्रदोष; स्वातंत्र्यवीर सावरकर जन्मदिन**

मुद्रक, प्रकाशक **श्री. रोहित रमाकांत पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ता: प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८, जिल्हा-ठाणे, महाराष्ट्र. येथे छापून घेतले व शॉप नं. २०२, अनुपम चेंबर्स, ७३३ सदाशिव पेठ, कुमठेकर रस्ता, पुणे-४११०३० येथे प्रसिद्ध केले.

संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.) संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिराती: ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः contact@navakal.in
**REGD. No. MAHMAR/2021/81075**

Printed and Published by **Rohit Ramakant Pande**
On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708, Dist-Thane, Maharashtra. Published at Shop No.202, Anupam Chembers, 733, Sadashiv Peth, Kumthekar Road, Pune-411030.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती



### कढी भेंडी



★ **साहित्य :** भेंडी - २०० ग्रॅम, दही - १ कप, बेसन - ३ चमचे, तेल किंवा तूप - २ ते ३ चमचे, मेथी दाणे - १/२ टीस्पून, मोहरी - १/२ टीस्पून, जिरे - १/२ टीस्पून, हिंग, हिरवी मिरची - १ चिमूटभर टीस्पून, कढीपत्ता - १०-१२, हळद - १/२ टीस्पून, लाल मिरची पावडर - १ टीस्पून, मीठ - चवीनुसार, बारीक चिरलेली कोथिंबिरी - सजावटीसाठी.

★ **कृती :** सर्वप्रथम गॅस चालू करून त्यावर कढई ठेवा. कढईत १ टीस्पून तेल टाका आणि ४ ते ५ मिनिटे मध्यम आचेवर चिरलेली भेंडी भाजून घ्या. लक्षात ठेवा की, भेंडीचा चिकटपणा निघून गेला पाहिजे आणि ती थोडीशी कुरकुरीत झाली पाहिजे. भेंडी सोनेरी झाल्यावर प्लेटमध्ये काढून बाजूला ठेवा. आता एका मोठ्या भांड्यात दही आणि बेसन एकत्र करा. बेसनाच्या सर्व गुठळ्या जाईपर्यंत फेटून घ्या. आता त्यात हळद, लाल तिखट आणि सुमारे ३ कप पाणी घालून मिक्स करा. एका खोलगट पातेल्यात दोन चमचे तेल किंवा तूप गरम करा. तेल गरम झाल्यावर त्यात मोहरी, जिरे, मेथी आणि हिंग टाका. मसाले तडतडायला लागल्यावर त्यात कढीपत्ता, चिरलेली हिरवी मिरची आणि आले-लसूण पेस्ट घालून एक मिनिट परतून घ्या. आता गॅस मंद करा आणि तयार दह्याचे मिश्रण टाकून ढवळा. चमच्याने सतत ढवळत राहा, म्हणजे दही फुटणार नाही. कढी १५-२० मिनिटे शिजू द्या. कढी चांगली शिजली आणि थोडी घट्ट होऊ लागली की, तळलेली भेंडी आणि चवीनुसार मीठ घाला. भेंडी घातल्यावर कढी मंद आचेवर ५ ते ७ मिनिटे शिजवा जेणेकरून भेंडी कढीचे सर्व स्वाद शोषून घेईल. भाताबरोबर किंवा चपाती बरोबर सर्व्ह करा.



## क्रीडा

# भारत दौऱ्यासाठी अफगाणिस्तानचा संघ जाहीर

## राशिद कसोटीबाहेर! अटल-रहमतचे पुनरागमन



**भारत दौऱ्यासाठी अफगाणिस्तानने कसोटी आणि वनडे संघाची घोषणा केली. यामध्ये स्टार फिरकीपटू राशिद खानला कसोटी संघातून वगळण्यात आले आहे. ६ जूनपासून न्यू चंदीगड येथे होणाऱ्या एकमेव कसोटी सामन्यासाठी सेदीकुल्लाह अटल, रहमत शाह आणि अजमतुल्लाह ओमरझाई यांचे पुनरागमन झाले आहे. हश्मतुल्लाह शाहिदीच्या नेतृत्वात अफगाणिस्तानचा संघ भारताविरुद्ध सामना खेळणार आहे.**

■ नवी दिल्ली

**अफगाणिस्तानच्या** संघात १५ सदस्यीय संघात अनुभवी आणि युवा खेळाडूंचा योग्य समतोल साधण्याचा प्रयत्न केला आहे. रहमत शाहच्या पुनरागमनामुळे मधल्या फळीला स्थैर्य मिळणार आहे. रहमतने अफगाणिस्तानच्या १२ पैकी ११ कसोटी सामने खेळले जाणार आहेत. सेदीकुल्लाह अटल आणि अजमतुल्लाह ओमरझाई यांना पुन्हा संधी देण्यात आली आहे. दोघांनी २०२४ मध्ये झिम्बाब्वेविरुद्ध कसोटी पदार्पण केले होते. अफगाणिस्तानचा फिरकीपटू राशीद खान कसोटी संघात नसल्याने चर्चा होत आहे. मुख्य प्रशिक्षक रिचर्ड पायबस यांनी राशिदला दीर्घकालीन फिटनेसवर लक्ष केंद्रित करण्याचा सल्ला दिल्यानंतर हा निर्णय झाला. त्यामुळे भारताविरुद्धच्या कसोटीत फिरकीची जबाबदारी कायस अहमद, शराफुद्दीन अशरफ आणि नांगेयालिया खारोटे यांच्यावर असणार आहे.

दरम्यान, भारतानेही अफगाणिस्तान मालिकेसाठी संतुलित संघ जाहीर केला. कसोटी आणि वनडे या दोन्ही संघांचे नेतृत्व शुभमन गिल करणार आहे. वनडे संघात ईशान किशनचे तब्बल तीन वर्षांनंतर पुनरागमन झाले आहे. त्याने शेवटचा वनडे सामना २०२३ मध्ये अफगाणिस्तानविरुद्ध खेळला होता. संघात रोहित शर्मा, विराट कोहली, के. एल. राहुल आणि हार्दिक पांड्या यांसारखे खेळाडू आहेत. मात्र, जसप्रीत बुमराह आणि रवींद्र जडेजा यांना विश्रांती देण्यात आली आहे. तर प्रिन्स यादव, मानव सुथार, गुरनूर बरार आणि हर्ष दुबे यांना पहिल्यांदाच भारतीय संघात स्थान मिळाले आहे. मानव सुथार आणि हर्ष दुबे यांच्याकडे फिरकी विभागात भविष्यातील पर्याय म्हणून पाहिले जात आहे. भारत आणि अफगाणिस्तान यांच्यातील ही मालिका युवा खेळाडूंना स्वतःला सिद्ध करण्यासाठी महत्त्वाची मानली जात आहे.

## आशियाई स्पर्धेत भारताचे पहिले सुवर्णपदक विजेते रणधीर यांचे निधन

■ नवी दिल्ली

**भारताचे** माजी नेमबाज आणि आशियाई क्रीडा स्पर्धेत नेमबाजीतील पहिले सुवर्णपदक जिंकणारे रणधीर सिंग (७९) यांचे निधन झाले. मागील काही काळापासून त्यांची प्रकृती खराब होती.

रणधीर सिंग यांनी १९७८ च्या बँकॉक आशियाई क्रीडा स्पर्धेत ट्रॅप शूटिंग प्रकारात सुवर्णपदक जिंकून इतिहास रचला होता. आशियाडमध्ये नेमबाजीत भारताला मिळालेले ते पहिले सुवर्णपदक होते. त्यांनी पाच ऑलिम्पिक स्पर्धांमध्ये भारताचे प्रतिनिधित्व केले होते. तसेच एका राष्ट्रकुल स्पर्धेतही त्यांनी सहभाग घेतला होता. त्यांच्या क्रीडा योगदानासाठी त्यांना १९७९ मध्ये अर्जुन पुरस्काराने सन्मानित केले होते. ते ऑलिम्पिक कौन्सिल ऑफ एशियाचे अध्यक्ष बनणारे पहिले भारतीय ठरले होते. मात्र, प्रकृतीच्या कारणास्तव त्यांनी नुकताच अध्यक्षपदाचा राजीनामा दिला होता. रणधीर सिंग यांच्या पश्चात पत्नी विनीता आणि महिमा, सुनैना व राजेश्वरी या तीन मुली आहेत. त्यांची मुलगी राजेश्वरी सिंग ही आंतरराष्ट्रीय नेमबाज असून, तिने २०२२ च्या आशियाई स्पर्धेत रौप्यपदक जिंकले होते.

## अमृत महोत्सवी मोहिते ट्रॉफी कॅरम स्पर्धा १ जूनला होणार

■ मुंबई

**आयडियल** स्पोर्ट्स अकॅडमी-ग्रुप आणि राष्ट्रीय मिल मजदूर संघ यांच्या संयुक्त विद्यमाने १६ वर्षांखालील शालेय मुलामुलींसाठी अमृत महोत्सवी क्रीडापटू गोविंदराव मोहिते ट्रॉफी कॅरम स्पर्धेचे आयोजन १ जून रोजी होणार आहे. ही स्पर्धा परेल येथील आरएमएमएस सभागृहात होणार असून, प्रवेश पूर्णपणे मोफत आहे.

स्पर्धेत पहिल्या आठ विजेते आणि उपविजेत्या खेळाडूंना आकर्षक पारितोषिके देण्यात येणार आहेत. आयडियल स्पोर्ट्स अकॅडमीचे कार्याध्यक्ष गोविंदराव मोहिते यांच्या वाढदिवसानिमित्त या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या शालेय खेळाडूंनी मोफत प्रवेश अर्ज आणि अधिक माहितीसाठी संयोजक लीलाधर चव्हाण किंवा प्रमुख पंच अविनाश महाडिक यांच्याशी २९ मेपूर्वी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले.

## ११६ चालींच्या लढतीनंतर गुकेशचा आर्मगेडनमध्ये पराभव

■ ओस्लो



**नॉर्वे** बुद्धिबळ स्पर्धेच्या दुसऱ्या फेरीत भारताचा विद्यमान विश्वविजेता डी. गुकेशला अमेरिकेच्या वेस्ली सो विरुद्ध पराभवाला सामोरे जावे लागले. तब्बल ११६ चाली चाललेल्या या रोमांचक सामन्यात गुकेश बराच वेळ आघाडीवर होता. मात्र विजय मिळवण्यात त्याला यश आले नाही. क्लासिकल सामना ड्रॉ झाल्यानंतर झालेल्या आर्मगेडन टायब्रेकरमध्ये वेस्लीने बाजी मारली.

सामन्यादरम्यान गुकेशने आक्रमक खेळ करत वेस्ली सोवर दबाव निर्माण केला होता. मात्र, शेवटच्या टप्प्यात वेस्लीने अचूक बचाव करत सामना ड्रॉकडे नेला. त्यानंतर अनुभवाचा फायदा घेत वेस्लीने विजय मिळवला. सामन्यानंतर वेस्लीने गुकेशचा खेळ त्याच्या रँकिंगसारखा वाटला नसल्याची प्रतिक्रिया दिली. दरम्यान, भारताच्या आर. प्रज्ञानंदलाही दुसऱ्या फेरीत पराभवाचा सामना करावा लागला. फ्रान्सच्या अलीझेरा फिरोझा विरुद्धच्या सामन्यात प्रज्ञानंद सुरुवातीला चांगल्या स्थितीत होता. मात्र, फिरोझाने जोरदार पुनरागमन करत विजय मिळवला. सलग दुसऱ्या विजयासह फिरोजा स्पर्धेच्या गुणतालिकेत अव्वल स्थानावर पोहोचला आहे. तर मॅग्नस कार्लसनने जर्मनीच्या विन्सेंट कीमरवर विजय मिळवला. क्लासिकल सामना ड्रॉ राहिल्यानंतर कार्लसनने सामना जिंकला.

महिला गटात भारताच्या दिव्या देशमुखने कोनेरू हम्पी पराभूत करत शानदार विजय मिळवला. या विजयामुळे दिव्या संयुक्तपणे दुसऱ्या स्थानावर आहे.

## सोलापुरात आजपासून रंगणार महिला खो-खो व कबड्डीचा थरार

■ सोलापूर

**सोलापूरमध्ये** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर मध्यवर्ती महामंडळाच्या वतीने राज्यस्तरीय महिला खो-खो आणि कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धा २८ ते ३० मेदरम्यान नॉर्थकोट प्रशाला मैदानावर होणार आहेत. सोलापूर जिल्हा कबड्डी असोसिएशन आणि उत्कर्ष क्रीडा मंडळ यांच्या सहकार्याने या स्पर्धा आयोजित केल्या आहेत.

या स्पर्धेत महाराष्ट्रातील प्रत्येकी आठ महिला संघ सहभागी होणार असून, सुमारे ३०० खेळाडू उपस्थित राहतील. दोन्ही स्पर्धांतील विजेत्या संघांना रोख पारितोषिके आणि स्मृतीचषक देण्यात येणार आहेत. प्रथम क्रमांकासाठी ५१ हजार रुपये, द्वितीय क्रमांकासाठी ३१ हजार रुपये आणि तृतीय क्रमांकासाठी १५ हजार रुपयांचे बक्षीस ठेवण्यात आले आहे.

## फ्रेंच ओपनमध्ये सबालेंकाची दमदार सुरुवात! ओसाकाही पुढील फेरीत

■ पॅरिस

फ्रेंच ओपन टेनिस स्पर्धेत जागतिक क्रमवारीत अव्वल असलेल्या एरिना सबालेंकाने दमदार विजयासह मोहिमेची सुरुवात केली. पहिल्या फेरीत तिने स्पेनच्या जेसिका बुजास मानेइरोचा सरळ सेटमध्ये पराभव करत पुढील फेरीत प्रवेश केला. जपानची नाओमी ओसाकाही विजयी सुरुवात करत पुढे गेली, तर पुरुष गटात दानिल मेदवेदेवचा पराभव झाला.

या स्पर्धेच्या पहिल्या फेरीत तिने स्पेनच्या जेसिका बुजास मानेइरोचा ६-४,,६-२ असा सरळ सेटमध्ये पराभव केला. या विजयासह सबालेंकाने ऑस्ट्रेलियन ओपन २०२५ पासून महिला एकेरीत सर्वाधिक ३० ग्रँड स्लॅम सामने जिंकण्याचा विक्रम केला. पुरुष गटात फक्त यानिक सिनर आणि कार्लोस अल्कारेझ यांनी तिच्यापेक्षा अधिक सामने जिंकले आहेत.विजयानंतर सबालेंकाने सांगितले की, तिने आपल्या नेट गेममध्ये सुधारणा केली असून आता त्या शैलीत खेळण्याचा आनंद घेत आहे. महिला एकेरीत जपानच्या नाओमी ओसाकानेही विजयी सुरुवात केली. तिने जर्मनीच्या लॉरा सीजमंडला हरवून पुढील फेरीत प्रवेश केला.

## मुंबई जिल्हा खो-खो स्पर्धेत शिवनेरी व ॐ साईश्वर विजेते

■ मुंबई



**मुंबईतील** माटुंगा येथे झालेल्या कुमार-मुली (ज्युनिअर) मुंबई जिल्हा अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धेत शिवनेरी सेवा मंडळ आणि ॐ साईश्वर सेवा मंडळ यांनी दमदार कामगिरी करत विजेतेपद पटकावले. मुलींच्या गटात शिवनेरीने श्री समर्थ व्यायाम मंदिरवर मात केली, तर कुमार गटात ॐ साईश्वरने सरस्वती स्पोर्ट्स क्लबला पराभूत करत सलग दुसऱ्यांदा अजिंक्यपद मिळवले. स्पर्धेत आरुषी गुप्ता आणि प्रशिक मोरे यांनी अष्टपैलू खेळाडूचा मान मिळवला.

मुली गटाच्या अंतिम सामन्यात शिवनेरी सेवा मंडळाने श्री समर्थ व्यायाम मंदिरवर ४-३ असा एका गुणाने विजय मिळवत अजिंक्यपदावर नाव कोरले. सामन्यात शिवनेरीच्या आरुषी गुप्ता, मुस्कान शेख, सिद्धी शिंदे, त्रिशा गुप्ता आणि गार्गी काडगेने उल्लेखनीय खेळ करत संघाच्या विजयात मोलाची भूमिका बजावली.कुमार गटाच्या अंतिम फेरीत ॐ साईश्वर सेवा मंडळाने सरस्वती स्पोर्ट्स क्लबचा १०-९ असा अवघ्या एका गुणाने पराभव करत सलग दुसऱ्या वर्षी विजेतेपद पटकावले. ॐ साईश्वरकडून प्रशिक मोरे, निषाद ताम्हणकर, सार्थक माडीये, अधिराज गुरव आणि आदित्य राणे यांनी उत्कृष्ट खेळ केला. तृतीय क्रमांकासाठी झालेल्या सामन्यांमध्ये मुली गटात ॐ साईश्वर सेवा मंडळाने ॐ समर्थ भारत व्यायाम मंदिरवर विजय मिळवला. तर कुमार गटात श्री समर्थ व्यायाम मंदिराने विद्यार्थी क्रीडा केंद्रला पराभूत करत तिसरे स्थान पटकावले.



# 'बॅकअप'मुळे झोया 'बचावली'

**प्रसिद्ध** चित्रपट निर्माती जोया अख्तर आणि रीमा कागती यांच्या टायगर बेबी डिजिटल एलएलपी या निर्मिती संस्थेच्या कार्यालयात ६६ हार्ड डिस्क चोरीला गेल्याची धक्कादायक घटना नुकतीच घडली. या प्रकरणावर जोया अख्तरने अधिकृत प्रतिक्रिया देत कार्यालयातील चोरीच्या वृत्ताला दुजोरा दिला आहे. तिने सांगितले की, माझ्या कार्यालयात चोरी झाली असून, हार्ड डिस्क गायब झाल्या आहेत. आम्ही या प्रकरणी पोलिसात तक्रार दाखल केली असून, पोलिसांनी काही जणांना अटकही केली आहे. ही अंतर्गत व्यक्तीने केलेली चोरी असून, पैशांसाठी लोक कोणत्या थराला जाऊ शकतात, हे पाहून वाईट वाटते. मात्र, सुदैवाने आमच्याकडे सर्व डेटाच्या बॅकअप फाईल्स उपलब्ध आहेत, असेही तिने स्पष्ट केले. कार्यालयातील एकूण १११ हार्ड डिस्कपैकी ६६ हार्ड डिस्क गायब असल्याचे अंतर्गत तपासणीत आढळले. या हार्ड डिस्कची साठवणूक क्षमता १६ टीबी ते ७२ टीबी दरम्यान होती. यामध्ये 'मेड इन हेवन' आणि 'घोस्ट स्टोरीज' यांसारख्या लोकप्रिय मालिका व चित्रपटांचे चित्रीकरण केलेले कच्चे फुटेज, संपादित दृश्ये आणि प्रदर्शित न झालेला महत्त्वाचा डेटा समाविष्ट होता. आरोपींनी या हार्ड डिस्क चोरून बाजारात विकल्याची कबुली दिली आहे.



# रणवीर अखेर चामुंडेश्वरीच्या चरणी

अभिनेता रणवीर सिंग याने कर्नाटक उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार म्हैसूर येथील प्रसिद्ध चामुंडेश्वरी देवीच्या मंदिराला भेट दिली आहे. गोव्यात पार पडलेल्या ५६ व्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवामध्ये 'कांतारा: चॅप्टर १' चित्रपटातील एका दृश्याची नक्कल केल्याबद्दल त्याच्याविरुद्ध तक्रार दाखल करण्यात आली होती. या कायदेशीर प्रक्रियेचा भाग म्हणून न्यायालयाने त्याला मंदिरात जाण्याचे निर्देश दिले होते.

याबद्दल रणवीर सिंगने यापूर्वीच जाहीर माफी मागितली होती. तसेच न्यायालयात सुधारित प्रतिज्ञापत्र सादर करून चामुंडेश्वरी मंदिराला भेट देण्याचे आश्वासन दिले होते, याची दखल घेत कर्नाटक उच्च न्यायालयाने त्याची बिनशर्त माफी स्वीकारली. सादर केलेल्या प्रतिज्ञापत्राची पडताळणी पूर्ण झाल्यानंतर न्यायालय या प्रकरणावर अंतिम निर्णय देण्याची शक्यता आहे.



# जास्मिनचा 'भारत दौरा'

**पंजाब** संगीत विश्वातील प्रसिद्ध गायिका जास्मिन सँडलास हिने तिच्या पहिल्यावहिल्या भारत दौऱ्याची अधिकृत घोषणा केली आहे. 'द ड्रीम गर्ल इंडिया टूर' असे या संगीत दौऱ्याचे नाव असून, याद्वारे ती पहिल्यांदाच भारतातील मोठ्या आखाड्यांमध्ये सोलो ॲक्ट करणार आहे. ऑस्ट्रेलियन दौऱ्याच्या प्रचंड यशानंतर जास्मिनच्या कारकिर्दीतील हा एक महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. या संगीत दौऱ्याचे नाव तिच्या स्वतःच्या जीवनप्रवासावर आधारित आहे. यामध्ये तिने एक तरुण गीतकार ते जागतिक स्तरावरील आघाडीची गायिका बनण्यापर्यंतचा प्रवास पार केला आहे. देशातील विविध विद्यापीठे आणि महोत्सवांमध्ये तिच्या सादरीकरणाला मिळालेल्या उत्तम प्रतिसादानंतर हा तिचा पहिला राष्ट्रीय दौरा असणार आहे. रणवीर सिंगच्या 'धुरंधर' चित्रपटातील तिच्या गाण्यांनी स्ट्रीमिंग प्लॅटफॉर्मवर मिळवलेल्या घवघवीत यशानंतर या दौऱ्याचे आयोजन केले जात आहे.

प्रत्येक शहरात १०,००० हून अधिक चाहत्यांसमोर जास्मिन आपली ऊर्जा आणि दमदार आवाज सादर करणार आहे. हा दौरा जुलै आणि ऑगस्ट महिन्यांत भारतातील प्रमुख मनोरंजन केंद्रांमध्ये आयोजित केला जाईल.

# जॅकींनी केली टायगरची पाठराखण





**बॉलिवूड** अभिनेता टायगर श्रॉफ याचे 'हिरोपंती २', 'गणपत', 'बडे मियाँ छोटे मियाँ' आणि 'बागी ४' हे अलीकडचे चित्रपट बॉक्स ऑफिसवर अपयशी ठरल्यानंतर त्याच्या कारकिर्दीबद्दल उलटसुलट चर्चा सुरू होत्या. या संपूर्ण परिस्थितीवर त्याचे वडील आणि ज्येष्ठ अभिनेते जॅकी श्रॉफ यांनी अखेर आपले मौन सोडले आहे. चित्रपटसृष्टीतील चढ-उतार हा आयुष्याचा एक अनिवार्य भाग असून, यश-अपयश हे आपल्या हातात नसते, अशा शब्दांत त्यांनी मुलाची पाठराखण केली आहे. जॅकी यांनी सांगितले की, कलाकाराने केवळ कठोर परिश्रम आणि निष्ठेवर लक्ष केंद्रित करणे गरजेचे असते. टायगरच्या कामाप्रती असलेल्या प्रामाणिकपणाचा आणि शिस्तीचा आपल्याला अभिमान असल्याचेही त्यांनी नमूद केले.

चित्रपटांच्या अपयशामुळे टायगर अजिबात विचलित झाला नसून तो अत्यंत सकारात्मकतेने या परिस्थितीचा सामना करत असल्याचा खुलासा जॅकी यांनी केला. आपण कलाकार आहोत आणि आपल्याला या सर्व प्रसंगांतून जावेच लागते, याची जाणीव टायगरला असल्याचे त्यांनी सांगितले.



# गायक अभिजितचे वरुणवर टीकास्त्र

**प्रसिद्ध** पार्श्वगायक अभिजित भट्टाचार्य यांनी आगामी 'है जवानी तो इश्क होना है' या चित्रपटातील 'चुन्नरी चुन्नरी' गाण्याच्या नव्या आवृत्तीवर तीव्र शब्दांत आक्षेप घेतला आहे. हे गाणे डेव्हिड धवन दिग्दर्शित १९९९ मधील 'बीवी नंबर वन' या चित्रपटातील असून, त्यात सलमान खान आणि सुष्मिता सेन यांनी काम केले होते. या गाण्याच्या रिमेकमध्ये आता वरुण धवन, मृणाल ठाकूर आणि पूजा हेगडे मुख्य भूमिकेत दिसत आहेत. अभिजित यांनी मूळ गाण्याचे महत्त्व सांगताना म्हटले की, हे गाणे सलमान खानच्या कारकिर्दीतील सर्वात मोठे आणि सदाबहार हिट गाणे आहे. वरुण धवनवर टीका करताना ते म्हणाले की, वरुण धवनने बऱ्याचदा जुन्या चित्रपटांच्या रिमेकमध्ये किंवा त्याच्या वडिलांनी दिग्दर्शित केलेल्या चित्रपटांमध्येच काम केले आहे आणि तो जुनी हिट गाणीच पुन्हा वापरतो. वरुण धवन हे गाणे गाऊन कधीही सलमान खान बनू शकत नाही. कारण सलमान आणि वरुण यांच्यात खूप मोठा फरक आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

गाण्याच्या नव्या रचनेबद्दल तीव्र नाराजी व्यक्त करताना अभिजित भट्टाचार्य म्हणाले की, जेव्हा त्यांनी हे नवीन गाणे ऐकले, तेव्हा त्यांना ते एखाद्या भजनासारखे वाटले. मूळ गाणे हे एक रोमँटिक नृत्यगीत होते. परंतु रिमेकमध्ये त्याचे रूपांतर भजनासारखे करण्यात आले आहे. नव्या आवृत्तीमुळे मूळ गाण्याचा दर्जा घसरला आहे. मूळ गाण्यामध्ये जी ऊर्जा आणि अभिनय होता, तसा वरुण धवनला कधीही करता आला नसता, म्हणूनच त्याने सुरक्षित मार्ग निवडला, असे सांगत त्यांनी वरुणच्या नृत्यावर आणि गाण्याच्या सादरीकरणावर टीका केली आहे.

# अनन्याच्या नृत्यावरून वादंग




**अभिनेत्री** अनन्या पांडेच्या 'चाँद मेरा दिल' या चित्रपटातील नृत्य दृश्यावरून सोशल मीडियावर सुरू असलेला वाद सध्या चांगलाच गाजत आहे. या चित्रपटातील अनन्याच्या भरतनाट्यम नृत्याची एक लहान क्लिप सोशल मीडियावर व्हायरल झाली. या क्लिपमधील तिच्या नृत्य कौशल्याची तुलना श्रीदेवी, साई पल्लवी यांसारख्या कसलेल्या शास्त्रीय नर्तिकांशी करून युजर्सनी तिच्यावर प्रचंड टीका करण्यास सुरुवात केली. हा वाद इतका वाढला की, तो केवळ एका नृत्यापुरता मर्यादित न राहता बॉलिवूडकडून भारतीय शास्त्रीय नृत्य आणि कलाप्रकारांचा होणारा अवमान, योग्य प्रशिक्षणाचा अभाव अशा मोठ्या मुद्द्यांवर जाऊन पोहोचला. या वादाचे रूपांतर अत्यंत वेगाने नेपोटीझम (घराणेशाही) आणि कलाकाराच्या वैयक्तिक आयुष्यावरील टीकेमध्ये झाले. विशेषतः महिला कलाकारांच्या शारीरिक हालचाली, वेशभूषा, अभिनय आणि हावभावांचे अत्यंत कठोरपणे व क्रूरतेने मूल्यमापन केले जाते, जे पुरुष कलाकारांच्या बाबतीत सहसा दिसत नाही. चित्रपट प्रदर्शित होण्यापूर्वी किंवा पूर्ण पाहण्यापूर्वीच केवळ एका क्लिपच्या आधारे त्याला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्याची ही पद्धत चित्रपटसृष्टी आणि प्रेक्षक या दोघांसाठीही घातक ठरत आहे.

# मुंबई-पुणे दरम्यान होणार नवा ग्रीनफील्ड एक्स्प्रेस वे

**संपूर्ण प्रवास केवळ ९० मिनिटांत होणार**

मुंबई

**भारतीय** राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने मुंबई-पुणे दरम्यानच्या नवीन आठ पदरी ग्रीनफिल्ड एक्स्प्रेस वेच्या सविस्तर प्रकल्प अहवाल आणि व्यवहार्यता अभ्यासासाठी निविदा मागवल्या आहेत. अंदाजे १५,००० कोटी रुपये खर्चाच्या या १३० किमी मार्गामुळे मुंबई-पुणे प्रवास केवळ ९० मिनिटांत पूर्ण होणार आहे.



प्राधिकरणाने यासंदर्भातील निविदा दस्तऐवज डाऊनलोड करणे आणि बोली सादर करण्यासाठी २४ जून ही अंतिम मुदत निश्चित करण्यात आली आहे. या निविदेसंदर्भात कंपन्यांना ५ जूनपर्यंत शंका किंवा प्रश्न उपस्थित करता येतील, तर 'प्री-बिड' बैठक ८ जून रोजी होणार आहे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने जारी केलेल्या अटींनुसार, भारतासोबत भूमी सीमा सामायिक करणाऱ्या देशांमधील बोलीदारांना वित्त मंत्रालयाने जुलै २०२० मध्ये जारी केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार सक्षम प्राधिकरणाकडे नोंदणीकृत असणे बंधनकारक करण्यात आले आहे. पुणे एक्स्प्रेस वे आणि राष्ट्रीय सध्या अस्तित्वात असलेला मुंबई-महामार्ग नेटवर्कवर वाहतुकीचा ताण प्रचंड वाढला आहे.

# पाचगणीत घोडे चालकांना ड्रेस कोड लागू केला

सातारा

**महाराष्ट्रातील** पहिल्याच उपक्रमांतर्गत पाचगणी नगरपरिषद आणि पोलीस प्रशासनाने पाचगणीतील पर्यटनस्थळांवरील घोडे चालक, छायाचित्रकार, हातगाडी चालक आणि इतर विक्रेत्यांसाठी ड्रेस कोड सक्तीचा केला आहे. हा निर्णय तत्काळ लागू करण्यात आला असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाईचा इशारा प्रशासनाने दिला आहे. पर्यटनस्थळांवर सेवा देणाऱ्यांसाठी अनिवार्य ड्रेस कोड लागू करणारे पाचगणी हे राज्यातील पहिले पर्यटनस्थळ ठरले आहे.

पर्यटन हंगामात अनधिकृत विक्रेत्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढते. पर्यटकांकडून जादा दर आकारणे, फसवणूक करणे तसेच मद्यधुंद अवस्थेत गैरवर्तन करणाऱ्या व्यक्तींविरोधात प्रशासनाकडे वारंवार तक्रारी येत होत्या.

# पालिका शाळांचे खासगीकरण थांबवा वरुण सरदेसाईंची आयुक्तांना मागणी

मुंबई

**मुंबई** महानगरपालिकेच्या शाळांचे भूखंड खासगी शैक्षणिक संस्थांना देण्याच्या प्रस्तावाला वरुण सरदेसाई यांनी तीव्र विरोध दर्शवला असून, हा प्रस्ताव अत्यंत चिंताजनक असल्याचे म्हटले आहे. यासंदर्भात त्यांनी मुंबई महानगरपालिका आयुक्त अश्विनी भिडे यांना पत्र पाठवून प्रस्ताव तत्काळ रद्द करण्याची मागणी केली आहे.

महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाकडून पीपीपी मॉडेलअंतर्गत पालिका शाळांच्या भूखंडांचे खासगी शैक्षणिक संस्थांना वाटप करण्याची प्रक्रिया सुरू असल्याबद्दल सरदेसाई यांनी चिंता व्यक्त केली. मुंबईत आधीच अनेक मराठी माध्यमांच्या शाळा बंद पडत आहेत. या मुद्द्यावर मी विधानसभेतही आवाज उठवला आहे. अशा परिस्थितीत पालिका शाळांचे भूखंड खासगीकरणाच्या दिशेने नेणे योग्य नाही, असे त्यांनी पत्रात नमूद केले.

ते पुढे म्हणाले की, खासगी शिक्षण सर्वसामान्य मुंबईकरांसाठी दिवसेंदिवस महाग होत असताना सद्यस्थितीतील हे मॉडेल मुख्यतः खासगी संस्थांच्या फायद्याचे दिसत आहे. सार्वजनिक मालकीच्या अत्यंत मौल्यवान जमिनींचा वापर करूनही महानगरपालिकेला त्यातून अत्यल्प महसूल मिळत असल्याची बाबही गंभीर आहे.

# फलटणच्या यशवंत बँकेवर अखेर अवसायकांची नियुक्ती

कराड

**भारतीय** रिझर्व्ह बँकेने फलटण येथील 'द यशवंत को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड' चा परवाना पूर्णपणे रद्द केला आहे. बँकेतील सुमारे ११२ कोटींच्या आर्थिक गैरव्यवहार आणि अनियमिततेमुळे सहकार विभागाला बँकेवर अवसायक नियुक्त करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार आता कोरेगाव येथील सहाय्यक निबंधक अभिमान थोरात यांची या बँकेचे अवसायक म्हणून नियुक्ती केली आहे.

परवाना रद्द करण्यात आलेल्या या बँकेच्या पाच लाखांच्या आतील ठेवीदारांना विम्याचे संरक्षण असलेले पैसे देणे व थकीत कर्जाची वसुलीची जबाबदारी अवसायकांवर असणार आहे. बँकेचे थकीत कर्ज १४० कोटी आहे. तर ११२ कोटींच्या अपहरा प्रकरणी बँकेचे संचालक व कर्मचाऱ्यांसह ५० जणांवर गुन्हा दाखल झाला आहे.

# आंबा बागायतदारांचे पुढील आंदोलन इतिहास घडविणार

**देवगड तालुक्यात संघटनेचा इशारा**

देवगड

**कोकणातील** आंबा व काजू बागायतदारांच्या न्याय हक्कासाठी आता मोठ्या आंदोलनाची तयारी सुरू झाली असून, हे आंदोलन इतिहास घडवणारे ठरेल, असा इशारा आंबा व काजू बागायतदार संघाचे अध्यक्ष आनंद उर्फ काका ढोके यांनी दिला आहे. या पार्श्वभूमीवर देवगड तालुक्यातील शेतकरी आणि बागायतदारांच्या गाठीभेटी घेण्यास सौंदाळे येथून सुरुवात करण्यात आली.



सौंदाळे येथे आयोजित केलेल्या या शेतकरी बैठकीत मोठ्या संख्येने आंबा व काजू उत्पादक सहभागी झाले होते. यावेळी गणेश गांवकर, किरण टेबुलकर, अजय तेली आदी उपस्थित होते. आंबा व काजू बागायतदारांच्या प्रश्नांसाठी सातत्याने लढा उभारणाऱ्या संघटनेचा शेतकऱ्यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. यंदा आंबा पिकावर आलेल्या अस्मानी संकटामुळे तालुक्यातील आंबा उत्पादनाला मोठा फटका बसला. अवकाळी वातावरण, बदलते हवामान आणि नैसर्गिक संकटांमुळे तब्बल ८० ते ८५ टक्के उत्पादन घटल्याचा दावा बागायतदारांनी केला आहे.

# एसटीला इ-बसेस पुरविणाऱ्या कंपनीचे कंत्राट पूर्णपणे रद्द करा

**महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेस संघटनेची मागणी**

मुंबई

**एसटीला** भाडेतत्त्वावर ५,१५० इलेक्ट्रिक बसेस पुरवण्याचे कंत्राट मिळवूनही ठरलेल्या मुदतीत १२८८ गाड्या देण्याचे उद्दिष्ट पूर्ण न करणाऱ्या 'इव्हे ट्रान्स' कंपनीचे कंत्राट रद्द करण्यात यावे. कंपनीच्या या दिरंगाईमुळे एसटी महामंडळाचे मोठे नुकसान झाले असून, वारंवार मुदतवाढ देऊनही कंपनी गाड्या पुरवण्यात अपयशी ठरल्यामुळे हे कंत्राट पूर्णपणे रद्द करावे, अशी मागणी महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेस संघटनेने केली आहे.

या संघटनेचे सरचिटणीस श्रीरंग बरगे यांनी सांगितले की, या कंत्राटदार कंपनीला सरकारकडून सतत मुदतवाढ, सवलती आणि नरमाई दाखवली जात असल्याने कंत्राटदार कंपनीला अभय मिळत आहे. वेळेत बसचा पुरवठा न केल्यामळे संबंधित कंपनीवर सुमारे १५ कोटी रुपये दंड आकारला जाणे अपेक्षित आहे. तसेच, या संपूर्ण प्रकल्पातील विलंबामुळे एसटी महामंडळाला आतापर्यंत १६१.३१ कोटी रुपये आर्थिक फटका बसला आहे.

आधीच आर्थिक संकटात सापडलेल्या एसटीला ही नुकसान भरपाई राज्य सरकारने द्यावी, अशी मागणीही बरगे यांनी केली.

# जावळीतील कुडाळ भागात धोम उजवा कालवा फुटला



जावळी

**तालुक्यातील** कुडाळ परिसरात धोम उजवा कालवा फुटल्याने लाखो लीटर पाणी वाया जात असून, शेतकरी वर्गातून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. गेल्या चोवीस तासांपासून कालव्याचे पाणी थेट रस्त्यावरून वाहत असल्याने कुडाळ-मेढा-पाचगणी रस्त्याला अक्षरशः नदीचे स्वरूप प्राप्त झाले आहे.

सध्या तालुक्यात अनेक भागांत पाण्याची टंचाई जाणवत असताना अशा प्रकारे मोठ्या प्रमाणावर पाण्याची नासाडी होत असल्याने पाटबंधारे विभागाच्या कार्यपद्धतीवर नागरिकांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. कालवा फुटल्यानंतर परिसरातील शेतांमध्ये तसेच रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात पाणी साचले असून, वाहन चालकांनाही अडचणींचा सामना करावा लागत आहे. दरम्यान, कालव्यातून बाहेर पडलेले पाणी तब्बल पाच किलोमीटरपर्यंत पसरल्याने परिसरातील काही ओढे व नाले तुंबल्यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. काही ठिकाणी शेतीपिकांनाही फटका बसण्याची शक्यता आहे. स्थानिक शेतकरी व ग्रामस्थांनी प्रशासनाने तातडीने दखल घेऊन कालव्याची दुरुस्ती करावी आणि पाण्याची होणारी नासाडी त्वरित थांबवावी, अशी मागणी केली आहे.

# पुण्यातील सारसबाग २ दिवस बंद महापौरांच्या पोस्टमुळे गोंधळ

पुणे

**पुण्यातील** प्रसिद्ध सारसबाग आणि येथील पेशवेकालीन तळ्यातील गणपती मंदिर हे २८ आणि २९ मे रोजी भाविक आणि पर्यटकांसाठी बंद ठेवण्यात येणार आहेत. सुरक्षेच्या कारणास्तव हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे. या निर्णयाबाबत सुरुवातीला पुणे महापालिकेकडून मंदिराच्या दुरुस्तीचे कारण सांगण्यात आले होते. काही वेळानंतर पुणे पोलिसांच्या आदेशानुसार कायदा आणि सुव्यवस्थेच्या कारणास्तव परिसर बंद ठेवण्याचा निर्णय झाल्याचे स्पष्ट करण्यात आले. मागील वर्षी ईदच्या काळात ही बाग बंद ठेवण्यात आल्याने वाद झाला होता.

या प्रकरणावरून चर्चेला उधाण आले असून, प्रशासनाच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. पुण्याच्या महापौर मंजुषा नागपुरे यांनी स्पष्टीकरण दिले. नागपुरे म्हणाल्या की, सारसबाग मंदिर बंद ठेवण्याचा निर्णय संपूर्णपणे पुणे पोलिसांनी घेतला आहे.

# कुंभमेळ्याच्या विकासकामांवर सुरक्षा उपाय करणे बंधनकारक


**कुंभमेळा प्राधिकरण आयुक्तांचे आदेश**

नाशिक

२०२७ च्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर सुरू असलेल्या सर्व विकासकामांमध्ये पावसाळ्यापूर्वी आवश्यक सुरक्षा उपाययोजना तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाने दिले आहेत. प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह यांनी यासंदर्भातील सविस्तर परिपत्रक जारी केले आहे.

आयुक्तांच्या या परिपत्रकात सर्व विभाग, कंत्राटदार आणि कार्यान्वयन यंत्रणांना ३१ मेपर्यंत कामे पूर्ण करून अनुपालन अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीअंतर्गत नाशिक आणि त्र्यंबकेश्वर परिसरात मोठ्या प्रमाणावर रस्ते, ड्रेनेज, घाट, पाणीपुरवठा आणि विविध नागरी सुविधा विकासाची कामे सुरू आहेत. पावसाळ्यात नागरिकांची सुरक्षितता आणि वाहतुकीत अडथळा निर्माण होऊ नये, यासाठी हे निर्देश अत्यंत महत्त्वाचे मानले जात आहेत. यामध्ये खोदकाम व ट्रेंचिंग भागांभोवती बॅरिकेडिंग, रेट्रो-रिफ्लेक्टिव्ह टेप्स, साईनबोर्ड व प्रकाशयोजना करणे आवश्यक, रस्ते, दुभाजक आणि नाल्यांमधील माती, बांधकाम साहित्य व कचरा हटविण्याचे आदेश आहेत.

## नवाकाळ शब्दकोडे–१६१९



**आडवे शब्द –**

१. मोती यात सापडतो ३. विष्णूच्या गळ्यातली माळ, जुन्या जमान्यातील प्रसिद्ध अभिनेत्री, मधुमती सिनेमात दिलीपकुमारची नायिका ७. त्रुटी, दोष, कमतरता ९. त्वचेवरचा डाग १०. कपाळावरची जखम १२. फेब्रुवारीत जास्तीचा दिवस असणारे वर्ष १४. लहान मूल १६. प्रचलित १७. वाटोळे १८. जहाज २१. लग्नप्रसंगी निघणारी मिरवणूक २३. अडचण, मनावरचे दडपण २५. मुक्काम २६. हरवलेले २८. गोजिरवाणा ससा ३०. विष्णू ३१. बुंदीचे मिष्टान्न ३२. अंगठा ३३. रेडा, टोणगा ३४. नम्र ३६. बेकी ३७. आकाशात झेप ३८. सुगंध ४०. व्याघ्र ४२. हंगाम ४३. ग्रंथातील उतारा, अवतरण ४४. खिसेकापू ४५. दूध-साखरेचा आटीव थंड पदार्थ ४७. सामूहिक आक्रंदन ४९. भगवान शंकराच्या स्वभावाचे वर्णन ५१. गुरांची जेवण्याची पद्धत ५२. दुसऱ्यासाठी घेतलेला त्रास ५३. शंकराचे वाहन ५५. कंठ ५६. पालखी ५८. बुद्धी ५९. शंकराचे वाद्य ६०. पाहुणचार ६२. वेळ ६५. सभा ६६. धैर्य ६७. वेगळे ६८. वाचन करणारा ७०. चामखीळ ७२. स्वीकार ७४. योग्य ७६. तिमिर ७७. वयाने ज्येष्ठ ७८. आले वाळवून केलेली पूड ७९. भीतीचे काल्पनिक कारण ८१. डंख ८२. धुंद ८३. कुबड ८४. नेत्रांजनाचा प्रकार ८५. अश्व ८६. आकाश ८७. पृथ्वी ९०. कन्या ९२. जंगल ९४. गर्दभ ९५. महाभारतात माद्रीची मुले ९७. नखरेल ९९. माजोरडा, मस्तवाल, हेकट १००. आनंदवार्ता, चांगली बातमी १०१. सोपे १०२. दुर्दशा १०३. खळगा

**उभे शब्द –**

१. 'घोडं मेलं ओझ्यानं ××× ×× ×××××' (एक म्हण) २. लक्षावधी ४. वजनदार ५. बोजवारा ६. तांबडी झाक ८. फुलांचा राजा ९. आंदोलन ११. श्रम १३. प्रभाव १५. मनातले विचार लपवणारा १७. आईचा भाऊ १९. त्वरित २०. टिकाव २२. अग्र २४. बारा २५. परंतु, तऱ्हा, प्रकार २७. लोभी २९. संकट ३०. मिठाईविक्रेता ३४. धांदरट, विसराळू ३५. प्राण नेणारा देव ३७. निकराचे प्रयत्न ३८. मुक्तता ३९. सुंदर स्त्री ४१. सलगी ४३. अर्धवट, खुळचट ४५. आदर ४६. मरायला टेकलेला ४८. रमलेला ५०. इडली-डोशाबरोबर दिले जाणारा गरम पदार्थ ५४. क्षुद्र माणूस ५५. विष्णूचे वाहन, पक्षीराज ५६. रोमांच ६०. च्यासह, समवेत ६१. सुन्न ६३. देवाचे भक्तांच्या मदतीला धावून येणे ६४. पोपट ६७. अवलंबित्व, मदार ६९. खंदक ७१. पंजाबी पोशाखातील दोन वस्त्रविशेष ७२. कणिक मळण्याचे पसरट भांडे ७३. कारल्याची चव ७४. खरबरीत ७५. बेपर्वा ७६. कमळ ७८. नाकाचे छिद्र न बुजण्यासाठी नाकात घातली जाणारी सोन्याची तार ७९. सूक्ष्म तपशील ८०. पुराणात उल्लेख केलेली मृताला जिवंत करणारी विद्या ८५. वृद्धी ८८. वर्ष ८९. मायभूमी ९१. सोने ९३. मासला ९४. पराभूत, ठार ९५. नूतन ९६. मैत्रीण, आठवण ९८. थट्टा •

**नवाकाळ कोडे क्रमांक १६१८ चे उत्तर**

**आडवे शब्द** : १. समाजकंटक ६. पायमल्ली ८. सुगंध ११. उर्वशी १२. पारपटल १५. पागा १६. माय १७. टीप १८. श्यामभटाची तट्टाणी २१. ओंगळ २२. माजी २३. रीघ २५. लय २६. पान २८. सन ३०. डाव ३२. भीती ३३. अवजड ३४. पारिपत्य ३६. जाजम ३७. लढत ३९. शिव ४०. त्याग ४१. बहीण ४२. लायक ४४. ज्ञाती ४७. तंगडी ४८. नार ४९. खाज ५०. लाचखाऊ ५२. रमणी ५३. फिकीर ५४. कीस ५५. दृढ ५६. रासभ ५८. दूर ५९. सीमा ६१. दाट ६२. कलम ६४. रवी ६७. वजा ६८. जहर ६९. ओलीस ७०. अंत ७१. कृष्ण ७२. गाऱ्हाणे ७४. माघ ७५. फुली ७६. सगा ७७. ठपका ७८. रस ७९. नगरसेवक ८१. पैलतीर ८३. कणव ८५. टप ८७. कडबा ८८. मंदवासर ९२. सामवेद ९४. जीत ९६. आच ९७. महिषासूर १००. धीरोदात्त १०२. परा १०४. सकस १०६. जाणीव १०८. डास १०९. ऐकीव ११०. हयगय १११. नाव टाकणे ११२. खेटर

**उभे शब्द** : १. सर्वसंगपरित्याग २. माशी ३. कंपायमान ४. टर ५. कपटी ६. पाल ७. मलमल ९. गंमत १०. लेंगा १३. टपरी १४. तंटा १५. पाणी पाजणे १९. भयभीत २०. चीज २४. घडा २७. नड २८. सत्य २९. खाजण ३१. वलय ३३. अवज्ञा ३५. पगडी फिरवणे ३६. जाहीर ३८. ढकलाढकली ४१. बनारसी ४२. लाज ४३. सखाराम ४५. तीर ४६. ऋणी ४७. तंबी ४९. खासदार ५१. ऊस ५२अ. मद्य ५७. भरत ६०. माजघर ६३. लस ६५. कृष्णकावळा ६६. पगार ६९. ओली ७०. अंगारक ७१. कृपण ७३. ऱ्हास ७४. मागमूस ७५. फुकट ७६. सती ७७. ठकबाजी ८०. सेवा ८२. लक्ष्यवेधी ८४. छंद ८६. पसार ८८. मंचक ८९. वाणी ९०. रमणीय ९१. गोषा ९३. दरोडा ९५. तपकीर ९६. आसव ९८. हिव ९९. सुग्रीव १०१. दास १०३. राव १०५. सह १०६. जाग १०७. भीक १०९. ऐट

# गोकुळच्या उत्पादनाला हलाल प्रमाणपत्र! निवडणुकीचा खेळ

पान १ वरून

शुद्ध शाकाहारी असलेल्या दुग्धजन्य उत्पादनांना हलाल प्रमाणपत्राची गरज काय, असा संतप्त सवाल सोशल मीडियावर विचारला जात आहे असे वातावरण निर्माण केले आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था आणि सप्टेंबर महिन्यात होणाऱ्या गोकुळच्या पंचवार्षिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हा मुद्दा तापवण्याचा प्रयत्न सुरू आहे.

गोकुळ दूध संघाच्या दूध, तूप, लोणी (बटर) आणि दूध पावडर या उत्पादनांसाठी मुंबईस्थित 'ज्युहफ सर्टिफिकेशन प्रायव्हेट लिमिटेड' (जमिअत उलेमा-ए-हिंद हलाल ट्रस्ट) या संस्थेकडून हलाल मुक्त प्रमाणपत्र घेण्यात आले आहे. या सर्टिफिकेटची वैधता १८ मार्च २०२८ पर्यंत आहे. हा निर्णय महायुती सरकारमधील वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांचे सुपुत्र साजिद मुश्रीफ हे गोकुळचे अध्यक्ष असताना घेण्यात आल्याचा दावा विरोधकांकडून केला जात आहे. यातून या प्रकरणाला आता राजकीय रंग चढवला आहे. गोकुळ दूध संघ आणि मंत्री हसन मुश्रीफ यांनी व्यावसायिक स्पष्टीकरण देत विरोधकांचे आरोप फेटाळले आहेत. गोकुळ प्रशासनाने एक परीपत्रक काढत म्हटले आहे की, हलाल प्रमाणपत्र हे कोणत्याही धार्मिक प्रचाराशी संबंधित नसून आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी आवश्यक असलेले केवळ एक तांत्रिक व गुणवत्ता मानक आहे. गोकुळचे तूप, लोणी आणि दूध पावडर ही उत्पादने मोठ्या प्रमाणावर अझरबैजान, सौदी अरेबिया, युएई, ओमान, कतार, कुवेत, तुर्की, जॉर्डन, सिरिया आणि बांगलादेश या आखाती (गल्फ) व इतर इस्लामिक देशांमध्ये निर्यात केली जातात या देशांच्या अधिकृत व्यापार नियमांनुसार 'हलाल प्रमाणपत्र' असल्याशिवाय तिथे कोणत्याही अन्नपदार्थांच्या आयातीला परवानगी मिळत नाही. हे भारतातील एफएसएसआय किंवा आयएसओ प्रमाणपत्रासारखेच एक व्यावसायिक मानक असून, उत्पादनात कोणतेही प्रतिबंधित किंवा मांसयुक्त घटक वापरलेले नाहीत, याची ती केवळ तांत्रिक खात्री असते. देशातील 'अमुल' आणि 'मदर डेअरी'नेही हे मानक स्वीकारले आहे. परदेशी निर्यात वाढल्यामुळे संघाला परकीय चलन मिळते, ज्याचा थेट फायदा ग्रामीण अर्थव्यवस्थेला आणि दूध उत्पादक शेतकऱ्यांना चांगला दर मिळण्यात होतो. या संपूर्ण विषयाकडे धार्मिक नव्हे तर आर्थिक आणि व्यावसायिक दृष्टिकोनातून पाहण्याची गरज आहे.

या प्रकरणी नाव आल्यावर मंत्री हसन मुश्रीफ यांनीही विरोधकांचा समाचार घेताना म्हणाले की, हा निर्णय नवीन नसून २०२२ सालापासून हे प्रमाणपत्र अस्तित्वात आहे. नविद मुश्रीफ तर आताच चेअरमन झाले. सध्या गोकुळच्या निवडणुका तोंडावर आल्यामुळे, ज्यांच्याकडे काही काम उरलेले नाही ते विरोधक जनतेत संभ्रम निर्माण करण्यासाठी मुद्दाम हा जुना विषय उकरून काढत आहेत.

गोकुळच्या कारभाराबाबत अनेक तक्रारी करणारे प्रतिस्पर्धी प्रकाश बेलावडे यांनी गोकुळ आणि हसन मुश्रीफ यांच्यावर हलाल सर्टिफिकेटवरून टीका केली आहे. ते म्हणाले की, संविधानात हलाल सर्टिफिकेटला मान्यता आहे का? संविधानात मान्यता नसताना ते घेण्याची गरज होती का ?आतापर्यंत साठ वर्षांत त्याची गरज लागली नव्हती. मग आताच ते का घेण्यात आले? त्याचा प्रस्ताव कुणी मांडला? त्यासाठी खर्च कुणी केला? हे जनतेला विचारून केले का? सत्तेत राजकारणात धर्म आणायचा नाही म्हणता. मग हे चालते का? गरज नसताना हे हलाल सर्टफिकेट घेण्यात आलेले आहे. गोकुळचे कुठलेच उत्पादन आखाती देशात जात नाही.

### हलाल म्हणजे काय?

'हलाल' ही इस्लाम धर्मातील संकल्पना असून, इस्लामच्या नियमांनुसार मान्य किंवा ग्राह्य असलेल्या गोष्टींना 'हलाल' म्हटले जाते. खाद्यपदार्थ, औषधे, सौंदर्यप्रसाधने किंवा इतर उत्पादनांमध्ये वापरण्यात आलेले घटक आणि उत्पादन प्रक्रिया इस्लामिक निकषांनुसार असल्यास संबंधित संस्थांकडून 'हलाल सर्टिफिकेट' दिले जाते. काही कंपन्या मुस्लिम ग्राहकांचा आणि बाजारपेठेचा विचार करून किंवा निर्यातीसाठी हलाल प्रमाणपत्र घेतात.

# मुंबईच्या सोसायट्यांमध्ये ईदच्या कुर्बानीवरून वाद

पान १ वरून

गोकुळधाम परिसरातील नागरिक म्हणाले की, सण साजरा करायचा असेल तर तो घरात करावा. त्यावर कोणतीही मनाई नाही. मात्र तो उघड्यावर करू नये. सातम म्हणाल्या की माझ्या शेजारील सोसायटीमध्येच खुल्या जागेत बकऱ्याची कुर्बानी दिली जाते आणि त्याला आम्ही कडाडून विरोध करत आहोत. सणासाठी एकत्र यायचे असेल, तर शेड उभारावी, कव्वाली आयोजित करावी, आपल्या बांधवांना भेटावे. मात्र खुल्या जागेत बकऱ्याची कुर्बानी देण्यास स्थानिक नागरिकांचा ठाम विरोध आहे. या परिसरात दोन शाळा आहेत, इस्कॉन सेंटर आहे आणि येथे मोठ्या प्रमाणात नागरिकांची वर्दळ असते. महानगरपालिकेच्या नियमांनुसार, कुर्बानीसाठी अधिकृत जागा निश्चित केलेली आहे. त्याच ठिकाणी कुर्बानी दिली पाहिजे. सोसायटीच्या खुल्या जागेत कुर्बानी देण्यास आधीच मनाई करण्यात आलेली आहे. कोणी उघड्यावर कुर्बानी देण्याचा प्रयत्न केला, तर संपूर्ण गोकुळधाम परिसरातील नागरिक रस्त्यावर उतरतील.

शिंदे सेनेचे मंत्री संजय शिरसाट यांनीही या वादावर प्रतिक्रिया देत म्हटले की, निवासी सोसायट्यांमध्ये अशा प्रकारे कत्तलखाने तयार करणे योग्य नाही. धार्मिक सण साजरे करण्यास कुणाचाही विरोध नाही, मात्र ज्या ठिकाणी लोक राहतात त्या निवासी भागात अशा प्रकारे प्राण्यांची हत्या होणे योग्य नाही.

दरम्यान, मिरा रोडच्या पूनम एस्टेट क्लस्टर-१ सोसायटीत ईदसाठी आणलेल्या बकऱ्यांवरून काल निर्माण झालेल्या वादात काशिमिरा पोलिसांनी आज कडक कारवाई करत तीन स्वतंत्र गुन्हे दाखल केले आहेत. सोसायटीत डुक्कर घुसविण्याचा प्रयत्न, धार्मिक घोषणाबाजी आणि मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी सुमारे ५० जणांविरोधात गुन्हे नोंदवण्यात आले आहेत. या वादादरम्यान एका बजरंग दलाच्या कार्यकर्त्यावर चाकू हल्ल्याची घटना घडली होती. या प्रकरणी अब्दुल कादरबाशा शेख (२२) याला अटक करण्यात आली. पोलिसांशी धक्काबुक्की करून सरकारी कामात अडथळा आणल्याप्रकरणी काही जणांविरोधातही गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

तणाव वाढू नये म्हणून पोलीस आणि पालिका प्रशासनाने सोसायटीच्या आवारात ठेवलेले ५१ बकरे अन्य ठिकाणी हलवले. सध्या परिसरात परिस्थिती नियंत्रणात असून कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी बकरे ठेवण्यासंदर्भात नवीन नियमावली तयार करण्याचा निर्णय पालिकेने घेतला आहे. मिरा-भाईंदर शहरात आणखी एक अधिकृत कत्तलखाना उभारण्याचा प्रस्तावही विचाराधीन आहे.

# नीट पेपरफुटीचा 'गॉड' तेजस शहा
## लातूरचा डॉक्टर शिरुरेलाही अटक

पान १ वरून- आरोप आहे. डॉ. अभंग प्रभू मेडिकल अकादमीचे संचालक सचिन हळदवणेकर यांनी करत स्पष्ट केले आहे की, तेजस शहाने अटक आरोपी मनीषा हवालदार हिची वैयक्तिक पातळीवर भेट घेतली होती, या प्रकरणाशी संस्थेचा काहीही संबंध नाही. आज अटक केलेला दुसरा आरोपी डॉ. मनोज शिरुरे हा लातूरचा रहिवासी आहे. आधी सीबीआय डॉ. शिरुरे याला या प्रकरणी माफीचा साक्षीदार बनवणार होती. पण कायदेशीर सल्ला घेतल्यानंतर आणि गुन्ह्यात त्याचा थेट हात असल्याचे स्पष्ट झाल्यावर सीबीआयने त्याला अटक केली. डॉ. शिरुरे याने हा पेपर आधीच अटक झालेला मुख्य आरोपी पी. व्ही. कुलकर्णी याच्याकडून घेतला होता.डॉ. मनोज शिरुरे याने तीन विद्यार्थ्यांना रसायनशास्त्राचा फुटलेला पेपर मिळवून दिला होता. यामध्ये लातूरमधीलच एका कोचिंग क्लास चालकाच्या मुलाचाही समावेश आहे. सीबीआयने आत्तापर्यंत प्रा. पी. व्ही. कुलकर्णी ,मनीषा गुरुनाथ मांढरे, मनीषा संजय हवालदार, मनीषा संजय हवालदार, शिवराज रघुनाथ मोटेगावकर, मनीषा वाघमारे यश यादव, विकास बिवाल, दिनेश बिवाल,शुभम खैरनार,धनंजय लोखंडे डॉ. मनोज शिरुरे आणि तेजस शाह या १३ आरोपींना अटक केली आहे.

# 'एसआयआर' घटनात्मकदृष्ट्या वैध! सर्वोच्च न्यायालयाचे शिक्कामोर्तब

पान १ वरून नागरिक नाही, असा होत नाही.

एसआयआर प्रक्रियेवर आक्षेप घेत असोसिएशन फॉर डेमोक्रेटिक रिफॉर्म्स (एडीआर), पीपल्स यूनियन फॉर सिव्हिल लिबर्टीज (पीयूसीएल) या स्वयंसेवी संस्थांसह योगेंद्र यादव आणि अन्य काही राजकीय पक्षांच्या नेत्यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केल्या होत्या. भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद ३२६ आणि लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५० नुसार निवडणूक आयोगाला एवढ्या मोठ्या प्रमाणावर अशा प्रकारे मतदार याद्यांची तपासणी करण्याचा अधिकार नाही. एसआयआर ही एक नागरिकता सिद्ध करण्याची प्रक्रिया असून अशी प्रक्रिया राबवण्याचा अधिकार केवळ केंद्र सरकारला आहे. निवडणूक आयोगाला नाही,असे याचिकाकर्त्यांचे म्हणणे होते. तसेच एसआयआरमुळे असंख्य मतदार विशेषतः वंचित,गरीब आणि स्थलांतरित कामगार ज्यांना कित्येक वर्षांपूर्वीचे कागदोपत्री पुरावे सादर करणे शक्य होत नाही त्यांचा मतदानाचा अधिकार हिरावून घेतला जाईल, अशी चिंता याचिकाकर्त्यांनी व्यक्त केली होती.

निवडणूक आयोगाच्या वतीने असा युक्तिवाद करण्यात आला होता की, मतदार याद्या स्वच्छ आणि पारदर्शक बनवणे हे आपले घटनादत्त कर्तव्य आहे. मृत व्यक्ती, अन्यत्र स्थलांतरित झालेले आणि दोन ठिकाणी मतदार याद्यांमध्ये नाव असलेल्या मतदारांची नावे हटवणे आवश्यक आहे. त्याचबरोबर आयोगाच्या वतीने घटनेतील अनुच्छेद ३२४ आणि ३२६ च्या हवाल्याने असा दावा करण्यात आला की, मतदार यादीत कोणाचे नाव सामील करावे आणि कोणाचे वगळावे हे आयोगाच्या अधिकार कक्षेत येते. तसेच कोणाही परदेशी नागरिकाला भारतात मतदान करण्याची संधी मिळता कामा नये, हे पाहणे हीदेखील आयोगाची जबाबदारी आहे. एसआयआर ही कठोर अशी प्रक्रिया नाही.ती बूथस्तरावर केली जाणारी एक सामान्य प्रशासकीय वैधता प्रक्रिया आहे.

या याचिकांवर सरन्यायाधीश सूर्य कांत आणि न्या.ज्यॉयमल्या बागची यांच्या खंडपीठासमोर २९ जानेवारी २०२६ रोजी सुनावणी पूर्ण झाली होती. मात्र न्यायालयाने निर्णय राखून ठेवला होता. आज त्यावर अंतिम निकाल देताना न्यायालयाने स्पष्ट केले की, एसआयआर प्रक्रिया घटनाविरोधी नाही आणि मतदार याद्या दुरुस्त करण्याचा अधिकार निवडणूक आयोगाच्या घटनात्मक अधिकार कक्षेत येतो.

**जाहीर सूचना**

दिवंगत श्रीमती भारती शिवानंद शेट्टी, सह-परवानाधारक/मे.संजना देशी बार चे भागीदार, सीएल-३ क्र.१३९ आणि सीएलबीआर-२ क्र.१० टागोर नगर, विक्रोळी (पू), मुंबई-८३, यांचे ०६.०३.२०२४ रोजी निधन झाले. श्री. साईराज शिवानंद शेट्टी यांनी सदर परवान्यातून त्यांचे नाव वगळण्याकरिता आणि स्वतःचे नाव समाविष्ट करण्याकरिता अर्ज केला आहे.

कोणा व्यक्तिस आक्षेप किंवा दावा असेल, त्यांनी तोया सूचनेच्या प्रकाशनापासून ६ दिवसांच्या आत, अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, मुंबई उपनगर, फोर्ट, मुंबई-४००००१ यांच्याकडे लेखी स्वरूपात सादर करावा, अन्यथा नियमानुसार कार्यवाही केली जाईल.

**ॲड. रुही खान**

**जाहीर सूचना**

दिवंगत श्रीमती भारती शिवानंद शेट्टी यांच्या कायदेशीर वारसांनी, फ्लॅट क्र.९८, ९ वा मजला, कल्पतरू हॅबिटॅट 'बी', डॉ. एस. एस. राव रोड, परळ, मुंबई-४०००१२ या संदर्भात, मृत व्यक्तीचा ५०% हिस्सा, हक्क आणि हितसंबंध सोडून देऊन ते हस्तांतरित करण्याबाबतचे 'हक्कसोड करार' त्यांचा मुलगा श्री. साईराज शिवानंद शेट्टी यांच्या नावे निष्पादित केले आहे.

सदर मालमत्तेबाबत ज्या कोणा व्यक्तीस कोणताही दावा, आक्षेप, हक्क किंवा हितसंबंध असेल, त्यांनी ही सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत, आवश्यक कागदपत्रांसह तसे लेखी कळवावे, अन्यथा, सदर व्यवहार कोणत्याही पुढील संदर्भाशिवाय पूर्ण केला जाईल.

**ॲड. रुही खान**

# कांदा प्रश्नावर केंद्र सरकार सकारात्मक

पान ८ वरून- गृहमंत्री अमित शाह आणि केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी राज्य सरकारच्या शिष्टमंडळासोबत चर्चा केली.या बैठकीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार तसेच राज्यातील मंत्री आणि आमदार उपस्थित होते. बैठकीनंतर बोलताना सुनेत्रा पवार म्हणाल्या की , आज कांदा, साखर आणि ऊस प्रश्नांवर केंद्र सरकारसोबत सकारात्मक चर्चा झाली. कांदा निर्यातबंदी आणि कांद्याच्या भावांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. केंद्र सरकारने पुढील दहा दिवसांत सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन दिले आहे.कांद्यावर कोणतीही निर्यातबंदी राहणार नाही. जर काही निर्बंध असतील तर ते पूर्णपणे हटवण्याबाबतही सकारात्मक चर्चा झाली आहे.

# स्टिरॉईड घेऊन ऑलिम्पिक खेळा!
## लास वेगासमधील सामन्यांवर टीकेची झोड

पान ८ वरून - आयोजकांच्या माहितीनुसार, सहभागींपैकी ९१ टक्के खेळाडू टेस्टोस्टेरॉनच्या तर ७९ टक्के खेळाडू ह्यूमन ग्रोथ हार्मोनच्या डोसवर होते.

या स्पर्धेत ग्रीक जलतरणपटू क्रिस्टियन गोलोमेव याने ५० मीटर फ्रीस्टाइल प्रकारात २०.८९ सेकंदांची वेळ नोंदवत अधिकृत जागतिक विक्रमापेक्षा वेगवान कामगिरी केल्याचा दावा करण्यात आला. यासाठी त्याला ९.५५ कोटी रुपयांचे बक्षीस देण्यात आल्याचे सांगितले जात आहे.या स्पर्धेवर जागतिक उत्तेजक प्रतिबंधक संस्था आणि अमेरिकन अँटी-डोपिंग एजन्सी यांनी तीव्र टीका केली आहे. अशा प्रकारच्या औषधांच्या अतिसेवनामुळे खेळाडूंच्या आरोग्यावर, विशेषतः हृदयावर गंभीर परिणाम होऊ शकतात, असा इशारा तज्ज्ञांनी दिला आहे. सुमारे ११,४६० कोटी रुपयांचे मूल्यांकन असलेल्या एनहॅन्स्ड गेम्स इंक कंपनीला सिलिकॉन व्हॅलीमधील गुंतवणूकदारांचा पाठिंबा आहे. डोपिंगला खुलेआम प्रोत्साहन देणारी ही पहिलीच स्पर्धा असल्याने क्रीडा नैतिकता, खेळाडूंचे आरोग्य आणि भविष्यातील क्रीडा संस्कृती यावर गंभीर प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

**जाहीर सूचना**

येथे सूचना देण्यात येत आहे की, राजेंद्र प्रसाद जवाहरलाल कनुजिया (सर्वसाधारण मुखत्यारपत्र धारक) यांनी, खालील अनुसूचीमध्ये वर्णन केलेली जमीन माझ्या अशिलाला विक्री करण्याचा प्रस्ताव दिला आहे.

कोणा व्यक्तिस सदर जमिनीबाबत विक्री, गहाण, वारसा हक्क किंवा कोणत्याही कराराअंतर्गत किंवा अन्य कोणत्याही प्रकारे कोणताही दावा असल्यास त्यांनी त्यासंबंधीचे समर्थक कागदपत्रांसह त्यांचा दावा खाली नमूद केलेल्या माझ्या पत्त्यावर या सूचनेच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात कळवावा, अन्यथा, संबंधित व्यक्तीचा दावा असल्यास तो त्याग करण्यात आलेला मानला जाईल.

**वर संदर्भित मालमत्तेची अनुसूची**

झोपडपट्टी म्हणून घोषित केलेली, वारसाहक्काने प्राप्त होणाऱ्या इतर अनुषंगिक बाबींसह असलेली, मुक्त-धारण व बिगर शेतजमिनीचे सर्व भाग व खंड; जिचे सी.टी.एस.क्र.५५, ५५/०१ ते ८, १७३, १७३/१ ते ३१, २२१, २२१/१ ते ९, २४०, २४०/१ ते २५, ३५६, ३५६/१ ते २४, ३६०, ३६०/१ ते १०, ३६६, ३६६/१ ते २३८, ३७९, ३७९/१ ते १० आणि ३८३, ३८३/१ ते ३ असे आहेत, जी अंधेरी विभागातील वांद्रे गावाच्या हद्दीत असून, तिचे एकूण क्षेत्रफळ अंदाजे ७०४१ चौरस मीटर इतके आहे.

दिनांक: २८ मे, २०२६

सही/-
मे. ॲडव्होकेट्स ॲंड सॉलिसिटर्स करिता
राजू धोत्रे / शरीफ काझी
पत्ता - दि अमन ग्रुप, अमन हायलँड पार्क, संजय नगर, पठाणवाडी, राणी सती मार्ग, मल्लिका हॉटेलजवळ, मालाड (पूर्व), मुंबई – ४०० ०९७.
संपर्क क्र.९६६४९९९९१०/८०८२६५७८६०

**पश्चिम रेल्वेकडून**
**गाडी क्र.०९०५७/०९०५८ सुरत ⇌ मंगळुरू विशेष गाडी**
**(वसई रोड मार्गे) नियमित करण्यात येणार**

| नियमित गाडी क्र. | प्रारंभिक स्थानक आणि गंतव्य स्थानक | प्रवासाच्या सुरुवातीची तारीख | प्रस्थान | आगमन |
|---|---|---|---|---|
| १९०५७ | सुरत - मंगळुरु (द्विसाप्ताहिक एक्स्प्रेस) | ०३.०६.२०२६ | १९.३५ वा. (बुध आणि रवि) | १९.४५ वा. (दुसऱ्या दिवशी) |
| १९०५८ | मंगळुरु - सुरत (द्विसाप्ताहिक एक्स्प्रेस) | ०४.०६.२०२६ | २२.३० वा. (गुरु आणि सोम) | २३.४५ वा. (दुसऱ्या दिवशी) |

**थांबा** : उधना, वलसाड, वापी, पालघर, वसई रोड, भिवंडी रोड, पनवेल, पेण, रोहा, माणगाव, खेड, चिपळूण, सावर्डा, संगमेश्वर रोड, रत्नागिरी, राजापूर रोड, वैभववाडी रोड, कणकवली, कुडाळ, सावंतवाडी रोड, थिविम, करमाळी, मडगाव, कानाकोना, कारवार, अंकोला, गोकर्ण रोड, कुमटा, मुर्डेश्वर, भटकळ, मुकांबिका रोड बयंदूर, कुंदापुरा, उडुपी, मुल्की आणि सुरथकल स्थानके दोन्ही दिशेने.

**रचना** : एसी २-टियर, एसी ३-टियर, स्लीपर क्लास आणि जनरल सेकंड क्लास डबे.

वेळ, थांबा आणि रचना यासंबंधी तपशीलवार माहितीसाठी, प्रवाशांनी कृपया www.enquiry.indianrail.gov.in ला भेट द्या.

पश्चिम रेल्वे
wr.indianrailways.gov.in
आम्हाला येथे लाईक करा आणि फॉलो करा
facebook.com/WesternRly
X.com/WesternRly
Instagram.com/WesternRly
https://www.youtube.com/@WesternRly
https://bit.ly/WesternRailwayOfficial

कृपया सर्व आरक्षित तिकिटांसाठी मूळ आयडी पुरावा सोबत ठेवा

**NOTICE**

Proposed Redevelopment of Building Known as "Thaver Mansion No.2, 3 & 4" [C. S. No. 1B/1479, 1A/1479], at Shivdas Chapsi Marg of Byculla Division at 'E' Ward is being developed by M/s. Nextgen Realtors, was accorded the Environmental Clearance from the State Level Environment Impact Assessment Authority (SEIAA), Environment Department, Govt. of Maharashtra on 2nd March, 2026.

The copies of clearance letter are available with the Ministry of Environment and Forest (MOEF) and may also be seen at website at http://parivesh.nic.in

# नवाकाळ

• पुणे | गुरुवार २८ मे, २०२६ • पान -८


## पॅरिसमध्ये उष्णतेत एसी नसलेल्या ट्रेनमध्ये प्रवासी गुदमरले!



**पॅरिस-** पॅरिसमध्ये तीव्र उष्णतेच्या लाटेमुळे पॅरिस-नाईस या नॉन-एसी ट्रेनमध्ये प्रवाशांना मोठा त्रास झाला. बाहेर अति उष्णता आणि ट्रेनमध्ये एसी नसल्यामुळे शेकडो प्रवाशांना श्वास घेण्यास त्रास झाला आणि काहींना गुदमरल्यासारखे वाटू लागले. परिस्थिती गंभीर होताच ट्रेन थांबवण्यात आली. त्यामुळे संपूर्ण प्रवासाला सुमारे चार तासांचा विलंब झाला. काही प्रवासी ट्रेनमधून खाली उतरून सावलीत गेले आणि त्यांना पाणी पिऊन श्वास घेण्याचा त्रास झाला. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.

## लग्न समारंभात सलाईन लावण्याचा ट्रेंड

**कॉकटेल सोडा, आता लग्नात पाहुण्यांना चढवलं जातंय सलाईन; 'खत ड्रिप'च्या एका पॅकेजसाठी मोजावे लागतायत दीड लाख रुपये!**



एका हाय-प्रोफाइल लग्नाच्या बजेटमध्ये आता ५० हजार ते १.५ लाख रुपये फक्त 'खत ड्रिप' लाउंजसाठी राखून ठेवले जात आहेत. ही आकडेवारी कोणत्याही हॉस्पिटलच्या बिलाची नाही, तर चक्क लग्नातील पाहुण्यांच्या 'वेलनेस' पाहुणचाराची आहे. 'बिग फॅट इंडियन वेडिंग'मध्ये आता कॉकटेल बारच्या शेजारीच 'खत ड्रिप बार' दिसू लागले आहेत.

**

डेस्टिनेशन वेडिंगमध्ये रात्रभर चालणाऱ्या पार्ट्या, नाचगाणी आणि मद्यपानामुळे येणारा थकवा घालवण्यासाठी हा नवा फंडा शोधला गेलाय. पाहुण्यांना दुसऱ्या दिवशी पुन्हा ताजेतवाने करण्यासाठी थेट नसेतून जीवनसत्त्वे आणि इलेक्ट्रोलाइट्स पुरवले जात आहेत. हा ट्रेंड सध्या सोशल मीडियावर आणि लक्झरी वेडिंग सर्कलमध्ये तुफान चर्चेत आहे.

**

याला 'खत ड्रिप वेडिंग लाउंज' असं नाव देण्यात आलंय. पूर्वी लग्नात फक्त मॉकटेल्स किंवा ज्यूसचे काउंटर असायचे. आता स्विमिंग पूलच्या काठी खास 'वेलनेस लाउंज' उभारले जातात. तिथे प्रशिक्षित वैद्यकीय कर्मचारी पाहुण्यांना सलाईनद्वारे व्हिटॅमिन्सचे डोस देतात.

**

या ड्रिपच्या मेनूमध्ये व्हिटॅमिन-बी कॉकटेलपासून ते 'हँगओव्हर क्युअर'पर्यंत अनेक पर्याय असतात. नवरीला लग्नाच्या दिवशी खास चमक हवी असेल, तर 'ग्लुटाथिओन' (ऱ्ह्रीींहळेपश) ड्रिपचा वापर 'ब्रायडल ग्लो'साठी केला जातो. हे सगळं एखाद्या स्पा ट्रीटमेंटसारखं लग्नाच्या मांडवातच पार पडतं.

**

खर्चाचा आकडा ऐकला तर डोळे पांढरे होतील. एका व्यक्तीसाठी या ड्रिपची किंमत ३,५०० रुपयांपासून सुरू होऊन १२,००० रुपयांपर्यंत जाते. संपूर्ण लग्नासाठी जर असे पॅकेज घेतले, तर त्याची सुरुवात ४५ हजारांपासून होते आणि पाहुण्यांच्या संख्येनुसार ती दीड लाखांच्या पुढे जाते. श्रीमंत वर्गासाठी हा आता स्टेटस सिम्बॉल बनला आहे.

**

हा ट्रेंड जितका ग्लॅमरस दिसतो, तितकाच तो वादग्रस्तही आहे. डॉक्टर याबद्दल वारंवार धोक्याचा इशारा देत आहेत. आयव्ही थेरपी ही एक 'इन्व्हेसिव्ह' वैद्यकीय प्रक्रिया आहे. ती एखाद्या पार्टीतील करमणूक किंवा 'क्विक फिक्स' उपाय नाही.

थेट नसेतून औषधं सोडल्यामुळे इन्फेक्शन होण्याचा धोका असतो. काही वेळा चुकीच्या डोसमुळे शरीरातील इलेक्ट्रोलाइट्सचं संतुलन बिघडू शकतं. सुई टोचलेल्या जागी सूज येणं किंवा गंभीर ॲलर्जी होण्याचे प्रकार घडू शकतात. तज्ज्ञांच्या मते, निरोगी माणसाला अशा ड्रिपची अजिबात गरज नसते.

**

तुम्ही तोंडावाटे घेतलेली जीवनसत्त्वे किंवा लिंबू सरबतही शरीराला तेवढीच ऊर्जा देऊ शकतं. जे पोषक घटक शरीर नैसर्गिकरित्या शोषू शकतं, त्यासाठी थेट रक्ताभिसरणात सुई खुपसणं हे अनाठायी आहे. शरीर जास्तीची जीवनसत्त्वे लघवीवाटे बाहेरच टाकून देतं, त्यामुळे हा फक्त महागडा दिखावा ठरतो.

**

तरीही ज्यांना हा अनुभव घ्यायचा आहे, त्यांच्यासाठी 'स्कल्प्टेड बाय कान' (ड्र्शीश्रीशिव लू घरप) सारख्या मोबाईल वेलनेस सेवा आता भारतात उपलब्ध आहेत. या सेवा थेट लग्नाच्या ठिकाणी तज्ज्ञ डॉक्टरांच्या देखरेखीखाली ड्रिपची सोय करतात. ही सेवा घेताना वैद्यकीय परवाना आणि सुरक्षिततेची खात्री करणं अनिवार्य आहे.

**

लग्नाचा आनंद हा आठवणींमध्ये असायला हवा, औषधांच्या बाटल्यांमध्ये नाही. ग्लॅमरच्या नावाखाली आरोग्याशी खेळ करणारा हा ट्रेंड भविष्यात काय वळण घेईल, हे सांगणं कठीण आहे. दिखाव्यासाठी स्वतःच्या शरीराला प्रयोगशाळा बनवणं ही एक महागडी चूक ठरू शकते.

## दादर, भायखळा, ग्रँटरोडमध्ये पुन्हा वीजपुरवठा खंडित झाला

■ मुंबई

**गेले** काही दिवस विजेचा लपंडाव सुरू असलेल्या दादर, भायखळा, ग्रँटरोड आणि लालबाग परिसरात आज पहाटे पुन्हा एकदा वीजपुरवठा खंडित झाला. सध्या उन्हाळ्याचे दिवस सुरू आहेत. मुंबईत उकाडा असह्य होत आहे.अशातच वीजपुरवठा वारंवार खंडित होण्याचे प्रकार या परिसरात वाढू लागले आहेत.

गेल्या आठवड्यात शुक्रवारी सायंकाळी दादर, वडाळा आणि पारसी कॉलनी परिसरात वीजपुरवठा काही तास खंडित झाला होता. तांत्रिक बिघाडामुळे वीजपुरवठा खंडित झाला, असे येथे वीजपुरवठा करणाऱ्या बेस्टच्या वतीने सांगण्यात आले होते. तर त्याच दिवशी रात्री २.२५ च्या सुमारास ट्रान्सफॉर्मर जळाल्याने गिरगाव आणि गावदेवी परिसरातील वीजपुरवठा खंडित झाला होता. तक्रार करण्यासाठी बेस्टने दिलेल्या फोन नंबरवर संपर्क साधण्याचा प्रयत्न करून फोन लागत नव्हते. त्यामुळे पंखा-एसीवाचून रहिवासी कासावीस झाले होते. हल्ली हे प्रकार वारंवार होऊ लागल्याने यामागे काहीतरी काळेबेरे नाही ना, असा संशय रहिवासी व्यक्त करीत आहेत.

## दहावी व बारावी बोर्ड प्रश्नपत्रिका आता ४ पानी

■ मुंबई

**राज्य** माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने दहावी-बारावीच्या प्रश्नपत्रिकांमध्ये महत्त्वपूर्ण बदल करत आतापर्यंत १० ते ११ पानांची असलेली प्रश्नपत्रिका फक्त ४ पानांची करण्याचा निर्णय घेतला. या नव्या धोरणानुसार प्रश्नांच्या स्वरूपात कोणताही बदल केला जाणार नाही. मात्र, पानांची मांडणी बदलून फॉन्टचा आकार आणि मांडणी अधिक लहान केली जाणार आहे. त्यामुळे कमी पानांत पूर्ण प्रश्नपत्रिका बसवली जाणार आहे. दरवर्षी प्रश्नपत्रिका छपाईसाठी सुमारे ३० कोटी रुपयांचा खर्च होत होता. नव्या बदलामुळे सुमारे २,००० टन कागदाची बचत होणार असून १५ ते १८ कोटी रुपयांची बचत अपेक्षित आहे. तसेच छपाई खर्चातही सुमारे २ कोटी रुपयांची कपात होणार आहे. एकूणच या निर्णयामुळे मंडळाची दरवर्षी सुमारे २८ कोटी रुपयांची बचत होणार आहे.

## पंढरपुरात एकादशीमुळे गुरूवारी ईदची कुर्बानी

■ पंढरपूर

**पुरुषोत्तम** अधिकमासातील एकादशीचा सोहळा आज पंढरपुरात मोठ्या भक्तिभावाने साजरा होत असताना, शहरातील मुस्लीम बांधवांनी सामाजिक सलोखा जपत एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. बकरी ईदच्या दिवशी केली जाणारी कुर्बानी आज न करता ती उद्या करण्याचा निर्णय मुस्लीम समाजाने घेतला आहे. बकरी ईद आज दुपारपासून उद्याचा दिवस आहे. पंढरपूर हे वारकरी संप्रदायाचे प्रमुख तीर्थक्षेत्र असून, येथे एकादशीच्या दिवशी लाखो विठ्ठल भक्त दाखल होतात.

## सिद्धिविनायक कॉरिडॉर पार्किंग विरोधात उबाठाचे आंदोलन

■ मुंबई



मुंबईतील श्री सिद्धिविनायक मंदिर परिसरातील प्रस्तावित कॉरिडॉर प्रकल्पांतर्गत प्रभादेवी येथील नर्दुल्ला टँक मैदानावर पार्किंग उभारण्याच्या निर्णयाला स्थानिक नागरिकांसह उबाठाने विरोध केला आहे. यावरून आज स्थानिक नागरिकांसह उबाठाचे स्थानिक आमदार महेश सावंत, नगरसेवक निशिकांत शिंदे यांनी आंदोलन केले.

नर्दुल्ला टँक मैदान हे प्रभादेवी परिसरातील नागरिकांसाठी महत्त्वाचे सार्वजनिक ठिकाण मानले जाते. लहान मुलांचे खेळ, ज्येष्ठ नागरिकांचा सकाळ-संध्याकाळचा फेरफटका तसेच विविध सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी या मैदानाचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. सिद्धिविनायक कॉरिडॉर प्रकल्पांतर्गत येथे पार्किंग उभारण्याचा प्रस्तावानंतर स्थानिकांमध्ये नाराजी पसरली आहे. विकासाच्या नावाखाली नागरिकांची हक्काची मोकळी जागा हिरावली जात असल्याचा आरोप आंदोलकांनी केला.

याबाबत आमदार महेश सावंत म्हणाले की, आमचा विरोध सिद्धिविनायक कॉरिडॉरला नसून थेट खेळाच्या मैदानाचा ताबा घेण्याच्या प्रस्तावाला आहे. नर्दुल्ला टँक मैदान ही प्रभादेवीकरांची हक्काची मोकळी जागा आहे. लहान मुलांसाठी आणि विविध सामाजिक उपक्रमांसाठी या मैदानाचा वापर होतो.

## कांदा प्रश्नावर केंद्र सरकार सकारात्मक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची माहिती

■ नवी दिल्ली



**राज्यातील** कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नावर केंद्र सरकार सकारात्मक आहे.कांद्याला दिलेला १५.८० रुपयांचा हमीभाव वाढवून देण्याची गरज आहे हे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी मान्य केले आहे. तूर्त नाफेड थेट शेतकऱ्यांकडून कांदा खरेदी करत आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अमित शहा आणि केंद्रीय कृषीमंत्र्यांशी झालेल्या बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना दिली. आंबा उत्पादक शेतकऱ्यांना मदत करायची तर विमा कायद्यातील काही जाचक अटी काढाव्या लागतील, विमा कंपन्यांची यासाठी लवकरच बैठक घेण्याचे आश्वासन दिले आहे, असेही फडणवीस यांनी सांगितले.

राज्यातील कांदा, ऊस आणि साखर उद्योगासंदर्भातील विविध प्रश्नांवर आज दिल्लीमध्ये केंद्र सरकारसोबत महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत केंद्रीय

» पान ७ वर

## अनिल अंबानी समूहाविरुद्ध पोलिसांचा १५० कोटींचा फसवणुकीचा खटला

■ मुंबई

**ॲक्सिस** बँकेची १५०.८४ कोटी रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने अनिल धिरुभाई अंबानी समूहातील कंपन्यांच्या माजी संचालकांविरुद्ध कफ परेड पोलिस ठाण्यात फसवणुकीचा खटला दाखल केला आहे.

ॲक्सिस बँकेचे उपाध्यक्ष प्रकाश प्रभाकर राव यांनी दिलेल्या तक्रारीवरून आर्थिक गुन्हे शाखेने हा खटला दाखल केला. एडीएजी समूहातील रिलायन्स होम फायनान्स लिमिटेड आणि व इतर लाभार्थी कंपन्यांच्या विरोधात ही तक्रार आहे. २९ जून २०१० रोजी आरएचएफएलने ॲक्सिस बँकेच्या नरिमन पॉईंट शाखेतून ५० कोटींची कॅश क्रेडिट लोन सुविधा घेतली होती. २० मे २०१३ रोजी ५० कोटींची मर्यादा आरएचएफएलने १०० कोटींपर्यंत वाढवून घेतली. त्यानंतर १५ एप्रिल रोजी बँकेने आरएचएफएलमध्ये ११५.०४ कोटींची गुंतवणूक केली. मात्र आरएचएफएलने कॅश क्रेडीटचे १०० कोटी व बँकेने कमर्शियल पेपर्सच्या माध्यमातून गुंतवलेल्या ११५.०४ कोटी थकवले. त्यामुळे २८ नोव्हेंबर २०१९ मध्ये बँकेने आरएचएफएलचे कर्ज बुडित घोषित केले. बँक ऑफ बडोदाच्या नेतृत्वात वित्तपुरवठादारांच्या कन्सॉर्टियमने आरएचएफएलचे फोरेन्सिक ऑडीटमध्ये कंपनीने ३,५७३.०६ कोटी थकीत कर्जे चुकवण्यासाठी वळते केले.

## सुनेत्रा पवार निवडणूक आयोगाला कार्यकारिणीची नवी यादी पाठवणार

■ मुंबई

**सत्ताधारी** राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये पुन्हा एकदा संघटनात्मक हालचालींना वेग आला असून, पक्षाच्या अध्यक्षा तथा उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार लवकरच पक्षाच्या कार्यकारिणीची नवी सुधारित यादी केंद्रीय निवडणूक आयोगाकडे पाठवणार आहेत. या नव्या यादीत जुन्या कार्यकारिणीतील ३ सदस्यांना वगळून ज्येष्ठ नेत्यांना संधी मिळण्याची शक्यता आहे. गेल्या महिन्यात पाठवलेल्या यादीत प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे यांची नावे नसल्याने राजकीय वर्तुळात चर्चा झाली होती. त्यानंतर पक्षाकडून ही तांत्रिक चूक सांगत दुरुस्ती करण्याचे स्पष्ट केले होते. आता सुधारित यादी पाठवण्याच्या निर्णयामुळे त्या चर्चांना पुन्हा उधाण आले आहे. यात सना मलिक, सुबोध मोहिते आणि प्रजापती या तीन सदस्यांची नावे नव्या यादीतून वगळली जाऊ शकतात. सना मलिक या नवाब मलिक यांच्या कन्या आहेत. त्यांच्या जागी मंत्री हसन मुश्रीफ यांना स्थान दिले जाण्याची शक्यता आहे. तसेच सुबोध मोहिते व प्रजापती यांच्या जागी सुनील तटकरे आणि प्रफुल्ल पटेल यांची वर्णी लागण्याची चर्चा रंगली आहे.

## देशातील पहिल्या हायड्रोजन ट्रेनला रेल्वे बोर्डाची मंजुरी

■ नवी दिल्ली

**हायड्रोजन** वायूवर चालणाऱ्या देशातील पहिल्यावहिल्या रेल्वे गाडीला रेल्वे बोर्डाने मंजुरी दिली आहे. ही गाडी उत्तर रेल्वे विभागातील जिंद ते सोनिपत दरम्यान धावणार आहे. नेहमीच्या विजेवर किंवा डिझेलवर चालणाऱ्या रेल्वे गाड्यांऐवजी या गाडीत हायड्रोजन वायूच्या सहाय्याने वीजनिर्मिती करून त्या विजेवर गाडी चालवली जाते.

या गाडीची कमाल वेगमर्यादा ताशी ७५ किलोमीटर एवढी आहे. डिस्ट्रिब्युटेड पॉवर रोलिंग स्टॉक (डीपीआरएस) या तंत्रज्ञानाचा वापर या गाडीमध्ये करण्यात आला आहे. या गाडीला रेल्वे सुरक्षा आयुक्तांकडून तसेच रिसर्च डिझाईन्स अँड स्टँडर्डस ऑर्गनायझेशनकडून हिरवा कंदील दाखवण्यात आला आहे. त्यानंतरच रेल्वे बोर्डाने या गाडीला मंजुरी दिली आहे.

## २५ कोटी रुपयांच्या आतील कामांसाठी कर्ज द्या! कंत्राटदारांचे केंद्राला पत्र

■ मुंबई

**सरकारी** आणि इतर विकासकामांमध्ये लहान कंत्राटदारांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतो. या समस्येवर मात करण्यासाठी २५ कोटींच्या आतील कामांसाठी अशा कंत्राटदारांना कमी व्याजाचे आणि दीर्घ मुदतीचे वर्क ऑर्डर फायनान्स म्हणजेच सुलभ कर्ज द्यावे. तसेच त्यांचे सर्व कर्जे आणि जीएसटी माफ करावी, अशी मागणी महाराष्ट्र कन्स्ट्रक्शन फोरमने केंद्र व राज्य सरकारला पत्र लिहून केल्याची माहिती महाराष्ट्र राज्य कंत्राटी महासंघाचे अध्यक्ष मिलिंद भोसले यांनी दिली

मिलिंद भोसले यांनी सांगितले की, गेल्या ३ ते ४ वर्षांपासून राज्यातील सर्व विभागांची विकासाची कामे केलेल्या छोटे छोटे विकासक, सुशिक्षित बेरोजगार अभियंता, कंत्राटदार यांची शासनाकडून देयके प्रलंबित आहेत. तसेच राज्यात जवळपास दोन वर्षांपासून नवीन विकासात्मक छोटी-छोटी कामे निघत नाही. जी निघतात ती १०० कोटींवर मोठ्या कंपनीसाठी असतात. याचा छोट्या विकासकाला फायदा होत नाही. त्यामुळे सुशिक्षित बेरोजगार अभियंते व कंत्राटदारांना कर्ज उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. यासंदर्भात राज्य अभियंता संघटना, महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ, महाराष्ट्र डेव्हलपमेंट फोरमने, महाराष्ट्र कन्स्ट्रक्शन फोरम यांनी २५ मे रोजी अर्थमंत्री निर्मला सीतारमण, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे गव्हर्नर संजय मल्होत्रा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे लेखी मागणी केली आहे.

## तटकरे पुत्रासाठी शिवसेनेची माघार? बदल्यात पालकमंत्रिपदाची मागणी

■ मुंबई

**राज्यातील** विधान परिषदेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघात महायुतीतील शिंदे गट आणि अजित पवार गटामध्ये तडजोड झाल्याची चर्चा आहे. अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांचे पुत्र अनिकेत तटकरे यांच्या उमेदवारीचा मार्ग मोकळा करण्यासाठी शिंदे गटाने आपला दावा मागे घेतला. मात्र, या निर्णयाच्या बदल्यात रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्रिपदाची मागणी शिंदे गटाने केल्याची माहिती आहे.

रायगड आणि नाशिक या दोन्ही जिल्ह्यांचे पालकमंत्रिपद राज्यात निवडणूक झाल्यापासून रिक्त आहे. रायगडसाठी शिंदे गटाकडून भरत गोगावले, तर अजित पवार गटाकडून अदिती तटकरे यांच्या नावावरून रस्सीखेच सुरू होती. विधान परिषद निवडणुकीच्या निमित्ताने या वादावर तोडगा काढण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे संकेत आहेत. हे पद शिंदे गटाच्या वाट्याला यावे, अशी अट घातल्याची माहिती आहे. या पदासाठी शिंदे गटाचे गोगावले यांच्या नावाची चर्चा आहे.

## मुंबई मुख्यालयात टाटा सन्सच्या संचालक मंडळाची बैठक संपन्न




■ मुंबई

**स्वयंपाकघरातील** मिठापासून ते मोठ-मोठ्या उद्योग धंद्यांमध्ये वापरल्या जाणाऱ्या कॉम्प्युटर सॉफ्टवेअरपर्यंत विविध क्षेत्रांमध्ये अग्रणी असलेल्या टाटा उद्योग समूहाची पितृ कंपनी टाटा सन्सच्या संचालक मंडळाची बैठक मुंबईतील बॉम्बे हाऊस मुख्यालयात संपन्न झाली. या बैठकीसाठी टाटा ट्रस्टचे अध्यक्ष नोएल टाटा सकाळीच मुख्यालयात दाखल झाले होते. टाटा सन्सचे अध्यक्ष एन. चंद्रशेखरन या बैठकीला उपस्थित होते. मात्र बैठकीनंतर सायंकाळी उशिरा बॉम्बे हाऊसमधून बाहेर पडताना ते माध्यमांशी न बोलताच निघून गेले. एअर इंडिया, टाटा डिजिटल आणि टाटा ईलेक्ट्रॉनिक्स या कंपन्यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी बैठकीला हजर होते. या कंपन्यांकडून टाटा समूहाला चांगल्या कामगिरीची अपेक्षा आहे. मात्र सध्या या कंपन्या तोट्यात चालल्या आहेत. या कंपन्यांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना सहा सदस्यीय संचालक मंडळासमोर काही सादरीकरण केल्याचे कळते. मात्र या बैठकीतून काय निष्पन्न झाले याची माहिती मिळालेली नाही. टाटा सन्सच्या संचालक मंडळाची पुढील बैठक १२ जून रोजी होणार आहे.

## शरद पवार पुन्हा रुग्णालयात दाखल

■ मुंबई



**ज्येष्ठ** नेते शरद पवार यांना पुन्हा एकदा मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. नियमित वैद्यकीय तपासणीसाठी त्यांना रुग्णालयात दाखल केले आहे. सध्या डॉक्टरांच्या देखरेखीखाली त्यांच्या काही महत्त्वाच्या चाचण्या सुरू आहेत. तपासण्या पूर्ण झाल्यानंतर त्यांना लवकरच रुग्णालयातून घरी सोडण्यात येणार आहे. मार्च महिन्यात पवार यांना प्रकृती अस्वास्थ्यामुळे पुण्यातील रुबी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. तर एप्रिल महिन्यातही दिल्ली येथून राज्यसभेची शपथ घेऊन परतल्यानंतर पुन्हा त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यावेळी काही दिवस उपचार आणि विश्रांतीनंतर त्यांना घरी सोडण्यात आले होते. यावेळी मात्र केवळ नियमित तपासणीसाठीच ते रुग्णालयात दाखल झाले आहेत.

## स्टिरॉईड घेऊन ऑलिम्पिक खेळा! लास वेगासमधील सामन्यांवर टीकेची झोड

**जगातील पहिली डोपिंग-फ्रेंडली क्रीडा स्पर्धा एनहॅन्स्ड गेम्स हा धक्कादायक प्रकार सुरू झाला आहे. यामुळे सध्या क्रीडा विश्वात मोठी खळबळ उडाली आहे. स्टिरॉईड्स घेऊन ऑलिम्पिक खेळा, असा वाह्यात विचार पुढे करीत ही स्पर्धा सुरू केली आहे. या स्पर्धेत खेळाडूंना कामगिरी वाढवणारी औषधे, स्टिरॉईड्स, हार्मोन्स आणि पेप्टाईड्स घेण्याची खुली परवानगी देण्यात आली होती. या स्पर्धेत जलतरण, धावणे आणि वेटलिफ्टिंग प्रकारांमध्ये ४२ आघाडीच्या खेळाडूंनी सहभाग घेतला. बंदी घातलेली औषधे घेण्यास परवानगी देण्यात आली.**

■ लास वेगास

**या** स्पर्धेमागे बायो-हॅकर आणि अब्जाधीश



उद्योजक ख्रिश्चन एंगरमेयर यांचा पुढाकार आहे. ते 'एनहॅन्स्ड गेम्स'चे सह-संस्थापक आहेत. एंगरमेयर स्वतः टेस्टोस्टेरॉन, वजन कमी करणारी औषधे आणि वाढीचे हार्मोन्स घेत असल्याचे उघडपणे सांगतात. मानवी क्षमतेच्या मर्यादा ओलांडणे हा या स्पर्धेमागील उद्देश असल्याचा दावा आयोजकांकडून करण्यात आला आहे. स्पर्धेत सहभागी खेळाडूंना टेस्टोस्टेरॉन, नाबॉलिक स्टेरॉइड्स आणि विविध पेप्टाइड्स वापरण्याची पूर्ण मुभा देण्यात आली होती.

» पान ७ वर